दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -५० रविवार दि.२६ ऑक्टोबर २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-50 Sunday, Dt.26 October 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# ८० ते ९० पोस्टमार्टेम करणारी मुलगी स्ट्राँग नसेल का?

## दबाव आणून तिला जीव द्यायला प्रवृत्त केलं; डॉक्टर तरुणीच्या बहिणीचा आरोप

फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या तरुण महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर तिच्या कुटुंबियांचा उद्रेक झाला आहे. आत्महत्या केलेल्या युवती डॉक्टरच्या चुलत बहिणीने सांगितले की, तिच्यावर पोस्टमार्टम अहवाल बदलण्यासाठी सतत दबाव आणला जात होता. फिट प्रमाणपत्र देण्यासाठी नकार दिल्याने तिच्यावर मानसिक त्रास वाढत गेला. तिने या संदर्भात अधिकाऱ्यांना पाच पानांचे पत्र आणि माहितीच्या अधिकाराखाली अर्जही दिला होता, परंतु त्यावर काहीच कारवाई झाली नाही, असा आरोप कुटुंबीयांनी केला.

**मुख्यमंत्र्यांनी फक्त हातावरील नोटवर न जाता पत्राची दखल घ्यावी**

चुलत बहिणीने सांगितले की, दररोज ८० ते ९० पोस्टमार्टम करणारी आमची बहीण कमी ताकदवान नव्हती; ती आत्महत्या करू शकत नाही, असे कुटुंबाने ठामपणे म्हटले आहे. मुख्यमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटवर न जाता, तिच्या दिलेल्या पत्राची दखल घ्यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. कुटुंबीयांनी सांगितले की, ती घरातील कर्ती मुलगी होती; तिच्या शिक्षणाचे कर्जही अद्याप फिटले नव्हते. आमची मुलगी परत येऊ शकत नाही, पण तिच्या आई-वडिलांना आधार देण्यासाठी तिच्या छोट्या भावाला नोकरी मिळावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

**कारवाई झाली नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित**

दुसरीकडे, व्हायरल झालेल्या तीन अर्जांमध्ये संबंधित महिला डॉक्टरनं आपल्या जीवाचं बरं वाईट झाल्यास पोलीस जबाबदार असतील असेही म्हटलं असतानाही कारवाई करावी, असे ना संबंधित यंत्रणेला वाटले ना डीवायएसपींना. त्यामुळे गेल्या पाच




महिन्यांपासून घडणाऱ्या घटनांनी व्यथित होऊन गेल्याचे दिसून येते. एका अर्जामध्ये उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर धुमाळ यांचा सुद्धा उल्लेख आहे. त्यांच्याकडूनही कारवाई झाली नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. त्यामुळे राजकारणी आणि पोलिसांच्या अभद्र युतीमध्ये एका महिला डॉक्टरचा बळी गेल्याने संतापाची लाट उसळली आहे.

सोशल मीडियामध्ये व्हायरल झालेल्या अर्जांमध्ये पहिला तक्रार अर्ज १९ जून २०२५ रोजीचा आहे. या अर्जामध्ये संबंधित डॉक्टर युवतीकडून फलटणचे डीवायएसपींच्या नावाने अर्ज लिहिण्यात आला आहे आणि या संदर्भात त्यांनी आरोपी फिट नसताना देखील 'मॅडम फिट द्या' असा दबाव आणल्याचा यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. याबाबत पोलीस निरीक्षकांना माहिती दिली होती. मात्र, त्यांनी सुद्धा उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे अर्जामध्ये उल्लेख आहे. यानंतर माहिती अधिकारातून कोणती कारवाई केली याची माहिती मागवली होती. यानंतर त्यांनी जिल्हा रुग्णालयाला चौकशी अहवाल दिला होता. त्यामध्ये त्यांनी आपलं बरं वाईट झाल्यास पोलिस जबाबदार असतील, असं म्हटलं होतं.

# धारूर घाटात ट्रक फेल; दिवसभर ट्रॅफिक जाम



प्रतिनिधी । धारूर

धारूर येथील घाट पुन्हा एकदा ठप्प झाला. शनिवारी सकाळी एका मोठ्या मालवाहू ट्रकने घाटातील तीव्र वळणावर अचानक फेल होऊन रस्त्याच्या मधोमध अडथळा निर्माण केला. त्यामुळे घाटमार्गावरील वाहतूक काही तास नव्हे तर दुपारपर्यंत ठप्प राहिली. वाहनचालक, प्रवासी, तसेच घाटातुन धावणाऱ्या बससेवा सर्वांनी प्रचंड त्रास सहन केला.

धारूर घाट हा अरुंद आणि अत्यंत वळणावळणाचा मार्ग म्हणून ओळखला जातो. या घाटात रस्त्याची रुंदी कमी असून, एका बाजूला खोल दरी आहे. त्यामुळे थोडीशी चूक झाली तरी मोठा अपघात होण्याची शक्यता कायम असते. मात्र, या घाटाच्या दुरुस्ती आणि सुरक्षा उपायांकडे संबंधीत विभागाचे पूर्ण दुर्लक्ष दिसून येत आहे. घाटातील वळणांवर चेतावणी फलक नाहीत, रस्त्याचे पृष्ठभाग वरखाली आहेत आणि ट्रॅफिक नियंत्रणासाठी कोणतेही स्थायी पथक नाही.सकाळी फेल झालेला ट्रक दुपारपर्यंत हलवण्यात आला नाही, परिणामी दोन्ही बाजूंना वाहनेच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही वाहनचालकांनी अपूऱ्या ' मार्गाने जाण्याचा प्रयत्न केला, तर काहीजण घाटातच अडकून पडले. स्थानिक नागरिकांनी तातडीने क्रेन बोलावण्याची मागणी केली, मात्र प्रशासनाकडून प्रतिसाद मिळायला उशीर झाला.

(उर्वरीत पान २ वर)



## अर्धवट सिमेंट रस्त्याच्या कामामुळे नागरिकांचा जिवधोक्यात

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी शहरातील वार्ड क्रं १६ मधील डॉ.खान यांच्या घरापासून ते काळा हनुमान मंदिर पर्यंत ते चौंडेश्वरी मंगल कार्यालय ते बंगला चौक पर्यंत नगरपंचायत कार्यालय अंतर्गत सिमेंट रस्त्याचे गेल्या एक वर्षापासून काम मंजूर झालेले आहे.गेल्या किती तरी महिन्यापासून हे काम ज्या गुत्तेदाराला हे काम दिलेले आहे.त्यांनी हा सिमेंट रस्त्याचे काम अर्धवट करून सोडून दिले आहे. यांच रस्त्यावर काळा हनुमान मंदिर समोरील अंडर ग्राउंड नाळ्यावर सिमेंट चे चेंबर आहे.ते पुर्ण पणे वर तोंड करून असल्यामुळे त्यांचे गंज वरी आल्या मुळे वाहतूकीस , धोकादायक झाले.येणारया जाणारया चारचाकी वाहनांना अडचण झाली.लहान मुलांना सायकल खेळताना मुलं पडत आहेत. ज्या संबंधित गुत्तेदारांने काम केले आहे.त्या गुत्तेदाराचे नगरपंचायत कार्यालय व संबंधित

(उर्वरीत पान २ वर)

# अंबाजोगाई नगर पालिका आमच्या ताब्यात दिल्यास शहराचा चेहरा बदलेल - आ. नमितावाई अक्षय मुंदडा

## योगेश्वरी मंदिर परिसरातील उद्यान सुशोभीकरणाचे भूमिपूजन संपन्न



अंबाजोगाई ।प्रतिनिधी

ऐतिहासिक योगेश्वरी मंदिर परिसराचे सौंदर्य आणखी खुलवण्यासाठी अमृत २.० योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या उद्यान सुशोभीकरण कामाचा भूमिपूजन समारंभ शुक्रवारी (दि. )२४) सायंकाळी पार पडला. या कामामुळे मंदिर परिसर अधिक आकर्षक, स्वच्छ आणि पर्यटकांसाठी सोयीस्कर होणार आहे. नगर पालिका आमच्या ताब्यात दिल्यास अंबाजोगाईचा चेहरा बदलून टाकू, असा ठाम निर्धार आमदार नमिता मुंदडा यांनी याप्रसंगी बोलून दाखवला.

सुशोभीकरणाच्या कामांत नवीन उद्यान रचना, पादचारी मार्ग, आधुनिक लाईटिंग, फुलबागा, बसण्याच्या जागा तसेच भक्त आणि पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहांची सुविधा उभारली जाणार आहे. या प्रकल्पामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

युवा नेते अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, मागील तीन वर्षांत आमदार नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून शहरात

(उर्वरीत पान २ वर)

# खाजगी गाडीवर 'पोलीस' फलक! बसस्थानकात वाहतुकीला अडथळा

प्रतिनिधी । धारूर

धारूर बसस्थानकासमोरील पोलीस चौकीजवळ एका पोलीस कर्मचाऱ्याने आपल्या खाजगी चारचाकी वाहनावर 'पोलीस' असा फलक लावून ती अधून मधून उभी करण्याचा प्रकार सुरूच आहे. या गाडीमुळे बसस्थानकात बस थांबण्यास अडथळा निर्माण होत असून नागरिक व वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

धारूर शहरातील मुख्य बसस्थानकाच्या फुटपाथवर, अगदी पोलीस चौकीसमोर, नेहमी एक खाजगी चारचाकी गाडी 'पोलीस' असा फलक लावून उभी राहते. चौकशीअंती समजते की




वरिष्ठांचा मौन आशीर्वाद?

ही गाडी एका पोलीस कर्मचाऱ्याची खाजगी मालकीची आहे. मात्र, संबंधित वाहन हे सरकारी नसतानाही त्यावर 'पोलीस' फलक लावण्यात आला आहे. नियमांनुसार कोणत्याही खाजगी वाहनावर अधिकृत पोलीस फलक लावणे हा स्पष्ट नियमभंग आहे.

या गाडीमुळे बसस्थानकातील बस थांबण्याच्या ठिकाणी अडथळा निर्माण होतो. प्रवासी बस थांबवण्यासाठी चालकांना गाडी चुकवून दुसऱ्या ठिकाणी थांबावे लागते. त्यामुळे प्रवाशांना चढ-उतार करताना गैरसोय होते.

(उर्वरीत पान २ वर)

# सावळदबारा - देऊळगांव गुजरीसह टिटवी रोडवर खड्डेच खड्डे

खड्डे बुजविण्यात यावेत - गुलाबराव पाटील कोलते

सावळदबारा ।प्रतिनिधी

सावळदबारा - देऊळगांव गुजरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेमुळे गाडी चालवताना अडचण निर्माण होत आहे. संबंधित विभागाने यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वाहनधारक करित आहेत.





सावळदबारा - देऊळगाव या रस्ता १० कि. मी रस्ता आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे मोठमोठे पडले असुन भाविक भक्तांना त्रास सहन करावा लागत आहे.सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहे. मोठ्या प्रमाणात विविध राज्यातील भाविक भक्त सावळदबारा येथे येत असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारक गाडी

(उर्वरीत पान २ वर)

# दिवाळी संपताच उसतोडणीसाठी स्थलांतराचा वाढता ओघ

## धारूर तालुका ओस पडू लागला

प्रतिनिधी । धारूर

दिवाळीचा सण संपताच धारूर तालुक्यात पुन्हा एकदा स्थलांतराच्या हंगामाला सुरूवात झाली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील साखर कारखान्यांकडे जाणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रकच्या रांगा ग्रामीण रस्त्यांवरून सतत दिसू लागल्या आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही तब्बल ६० ते ७० हजार मजूर उसतोडणीसाठी स्थलांतरित झाले असून, गावागावांत ओसाडपणा जाणवू लागला आहे.



दिवाळीच्या उत्सवानंतर धारूर तालुक्यातील मजूरवर्ग पुन्हा एकदा उपजीविकेच्या शोधात घरदार सोडून बाहेर पडला आहे. महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील विविध साखर कारखान्यांमध्ये उसतोडणीच्या

(उर्वरीत पान २ वर)

# दिंद्रुडमध्ये दीपोत्सव साजरा

दिंद्रुड ।प्रतिनिधी

दीपावली पर्वाच्या निमित्ताने दिंद्रुड गावात प्रथमच मातृभूमी दीपोत्सव साजरा केला गेला. कर्तव्य आणि नोकरी निमित्ताने गावाबाहेर असणाऱ्या गावातील तरुणांनी मिळून मातृभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून ग्रामदैवत खोलेश्वर मंदिर प्रांगणात या भव्य उत्सवाचे आयोजन केले होते.१५५१ पणती दिवे,३१ किलो भव्य रांगोळी,३१ किलो फुले यांच्या माध्यमातून खोलेश्वर मंदिर प्रकाशमान करत हा कार्यक्रम पार पडला.

दिंद्रुडला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा आहे,बाजार पेठेच गाव असल्याने गावात अनेक उपक्रम राबविले जातात, अशात दीपावली सणाच्या औचित्याने संस्कृती परंपरेतून गावाला नवं वैभव प्राप्त करून देण्यासाठी हा भाऊबीज दिवशी हा दीपोत्सव आयोजित करण्यात आला.ज्यात हजारो महिला आणि गावकरी यांनी उपस्थिती दर्शवली,दिव्यांची भव्य आरास महिलांसाठी तर ड्रोन शूटिंग लहानग्यांमधे अधिक उत्साह वाढवणारे ठरले. मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शिरीषकुमार रामदासी,परशुराम लांडे,विशाल ठोंबरे,ज्ञानेश्वर ठोंबरे,सौरभ पासंगे,एकनाथ हंगरगे,पृथ्वीराज शर्मा,ईश्वर आप्पा गौंडर,शुभम बसेट,निखिल सपाटे,देवराज ठोंबरे,सिद्धेश भुजबळ,आकाश मुसळे,श्रीराम ठोंबरे,संदीप मुसळे,आदिनाथ कटारे,श्याम कटारे,आकाश सुरवसे,विजय कांबळे,यश गौंडर यांचा सहभाग होता तर ड्रोन शूटिंग साठी पांडुरंग कटारे यांचे विशेष सहकार्य लाभले.दिवाळी आपल्या सर्वांसाठी आनंदाचा सण आहे,आम्ही गावाबाहेर असलो तरी दीपावली निमित्त आवर्जून गावात येतो, आपले सण संस्कृती आणि परंपरेशी जोडलेले आहेत, त्यातून गावात एक चांगला उपक्रम घेण्याचा प्रयत्न आम्ही केला.गावातील तरुण मित्र,महिला आणि समस्त गावकऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी सर्वतोपरी सहकार्य केले, त्यातून हा दीपोत्सव अधिक सुंदर



ठरला.मी सर्वांचे आभार व्यक्त करतो. पुढील वर्षी आणखी काही नवीनतम करण्याचा नक्कीच प्रयत्न करू -शिरीषकुमार रामदासी

हे गाव आमचे जन्मठिकाण आहे,कुठेही असली तरी मातीची नाळ जोडून आहे, दीपावली निमित्त काही करूया या विचारातून ही संकल्पना सुचलीमित्रांसमोर प्रस्ताव ठेवला आणि अगदी २ दिवसांच्या नियोजनात हा कार्यक्रम आम्ही

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

### संचालकांबाबतची संदिग्धता

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? 'पूर्ण वेळ संचालक' ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते.

महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु 'सलग' या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत 'सलग' शब्दाऐवजी 'एकूण' असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली!

# वडवणी तालुक्याच्या लेकीचा बळी घेणाऱ्या आरोपींना फाशी द्या : अशोक निपटे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मुख्यमंत्र्याकडे मागणी

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकरी कन्या असलेल्या डॉक्टर संपदा मुंडे या मुलीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या नराधमांना तत्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक तथा राज्य संघटक संजयजी भोकरे, गोविंदजी वाकडे प्रदेशाध्यक्ष,डॉक्टर विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस, वैभव स्वामी सर प्रदेश संपर्कप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा वडवणीच्या वतीने वडवणी तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनातून मागणी करण्यात आली की, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची मुलगी असलेली डॉक्टर संपदा हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करीत मोठ्या धैर्याने शिक्षण घेतलं होतं. डॉक्टर झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात नोकरी लागली होती मात्र तेथील पोलीस अधिकाऱ्याने तिचा जाणीवपूर्वक छळ केला. वेळोवेळी झालेल्या छळाला वाचा फोडण्यासाठी तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. मात्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देखील लक्ष दिल नाही. वरिष्ठांकडे तक्रार केल्याचे माहिती झाल्यानंतर फलटणच्या पोलिसांनी तिला अधिकच त्रास देणे सुरू केले. या



त्रासाला कंटाळून तिने अखेर आत्महत्या केली. तिच्या आत्महत्यास कारणीभूत ठरलेले पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष अशोक निपटे यांनी पोलीस प्रशासन आणि शासकीय यंत्रणेवर कडाडून टीका केली. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे सर, डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतीश मुजमुले, पत्रकार संघाचे तालुका सचिव अर्जुन मुंडे, ज्ञानेश्वर लंगे, अशोक फपाळ, प्राध्यापक सोमेश्वर कोठुळे, शेख एजाज, शंकर झाडे, विष्णू डोईफोडे, संपादक हनुमंत म्हात्रे, भैय्यासाहेब काकडे, शांतिनाथ जैन, गंगाभिष्म अंडील आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी तहसील कर्मचारी मंगेश बुचडे यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र आता गुन्हेगारांचं राज्य: प्रा. काकडे

पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास काकडे सर यांनी देखील यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना महाराष्ट्र राज्यातील महिला मुलीवर होणाऱ्या अत्याचारांची मालिका सांगितली. महाराष्ट्र राज्य हे गुन्हेगारांचा राज्य झाल आहे. या राज्यात लेकीबाळी आता सुरक्षित राहिलेल्या नाहीत. असा थेट आरोप करीत त्यांनी राज्याचे गृहमंत्री असलेले मुख्यमंत्री बघ्यांच्या भूमिकेत दिसत आहेत. अशी टीका त्यांनी केली.



## माजलगाव स्थानिक स्वराज्यसंस्था निवडणूकीत राखीव जागा लढवणार - डॉ जितेंद्र ओव्हाळ

माजलगाव ।प्रतिनिधी

अगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी माजलगाव येथील शासकीय विश्रामगृह येथे शनिवारी प्रमुख पदाधिकारी यांची बैठक घेतली

डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच माजलगाव शाखेच्या वतीने डॉ जितेंद्र ओव्हाळ यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी माजलगाव नगरपरिषद तसेंच जिल्हापरिषद पंचायत समितीच्या निवडणुकी संदर्भात सर्व प्रमुख कार्यकर्त्यांशी महत्वपूर्ण चर्चा केली.

गोरगरीब लोकांचा आजवर मतासाठीच वापर झाल्याचा आरोप डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी केला फुले शाहू आंबेडकरी जनता आता कोणालाही माफ करणार नसल्याचे सांगत होणाऱ्या निवडणुकाबाबतीत योग्य निर्णय घेऊ तसेच राखीव जागावर आपल्या कार्यकर्त्यांनी उभे रहाण्याची तयारी करावी असे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी माजलगाव येथे केले या वेळी कृष्णा पवार, दत्ता गायकवाड, सुशील कुलकर्णी, सुनील जाधव, अविनाश घायाळ, संजय वाव्हळ, विनोद मोरे,अमोल जाधव, आदित्य सोळंके, पीयूष लोकरे, कृष्ण पवार याच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## तेलगाव जिल्हा परिषद निवडणुकीसाठी डीपीआय ची आढावा बैठक संपन्न

### तेलगाव मधून मनीषा कांबळे यांचे नाव अजिंक्य चांदणे यांच्याकडून घोषित

**तेलगाव ।प्रतिनिधी**

**जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजले असुन, येत्या काही काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने उमेदवाराची चाचपणी चालू आहे. बीड जिल्ह्यातील तेलगाव जिल्हा परिषद गटासाठी मनीषा नवनाथ कांबळे यांच्या उमेदवारी ची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी काल शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित आढावा बैठकीत केली.**




महाविकास आघाडीसोबत डिपीआय हा पक्ष असून जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील राखीव गटांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे आपण मागणी करणार असल्याचे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी तेलगाव येथील आढावा बैठकीत सांगितले. यात तेलगाव गटाच्या जागी आपण कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असून या भागात डीपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांच्या सुविद्य पत्नी मनीषा कांबळे यांच्या उमेदवारीची घोषणा अजिंक्य चांदणे यांनी शुक्रवारी सायंकाळी येथील आढावा बैठकीत केली. यावेळी बोलताना महाविकास आघाडीने आमचा विचार केला नाही तर आम्ही कुणाच्याही ताटाखालचे मांजर होणार नाही तर स्वबळावर या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे ही सांगितले. यासाठी समाजासह तेलगाव गटातील मतदारांच्या दारादारात जाऊन मतांची चाचपणी करण्याच्या सूचना चांदणे यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. या बैठकीस तेलगाव जिल्हा परिषद गटातील डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चा बहुसंख्य कार्यकर्ता वर्ग उपस्थित होता.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाने युती धर्म पाळत कसलीही अपेक्षा न ठेवता महाविकास आघाडीचे काम केले. याचीच जाण राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार व खासदार बजरंग सोनवणे ठेवतील व आम्हास या निवडणुकीत न्याय देतील अशी अपेक्षा आहे.

- अजिंक्य चांदणे

प्रदेशाध्यक्ष डी पी आय महाराष्ट्र राज्य

कोण आहेत नवनाथ कांबळे -

नवनाथ कांबळे हे तेलगाव गटातील मोहखेड येथील रहिवासी असून ते रिपोर्टरचे पत्रकार आणि डीपीआय चे बीड युवक जिल्हाध्यक्ष आहेत. सामाजिक कार्यात कांबळे सदैव अग्रेसर असतात. तेलगाव गटातील प्रत्येक गावात त्यांनी आपल्या सामाजिक दायित्वाने विशेष ओळख निर्माण केली असून, या निवडणुकीत त्यांच्या सुविद्य पत्नी मनीषा नवनाथ कांबळे या महाविकास आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचे संकेत आहेत.

### पान १ वरून...

**धारूर घाटात...**

दरवर्षी घाटात अशा घटना घडत असूनही कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी प्रशासनाकडे धारूर घाटाचे रुंदीकरण, सुरक्षा फलक आणि पोलिसांचे कायमस्वरूपी पथक नियुक्त करण्याची मागणी केली जात आहे. घाटातील ही परिस्थिती प्रशासनाच्या बेफिकीरीचे द्योतक ठरत आहे

**सावळदबारा - देऊळगांव ..**

चालवाताना खड्ड्या मुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहे.दर्शन घेण्यासाठी विविध राज्यातील भाविक भक्त याच सावळदबारा -देऊळगाव रस्त्यावरून ये जा करतात.सावळदबारा या ठिकाणी कामा निमित्त येण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांना याच रस्त्यावरून ये -जा करावी लागते.सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँक,जिल्हा मध्यवर्ती बँक,शाळा,कॉलेज, महाविद्यालय, महावितरण कार्यालय, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी,पशु वैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, या ठिकाणी सावळदबारा आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांना येथे दररोज सावळदबारा येथे काम निमित्त ये जा करावी लागते.

टिटवी रोडवर खड्डे मोठमोठे होत आहे.त्यातील गिट्टी बाहेर आली आहे.

संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते सह वाहनधारक करीत आहेत.

**अंबाजोगाई नगर पालिका..**

रस्ते काँक्रीटीकरण, पाणीपुरवठा योजना, नाली बांधकाम, स्ट्रीटलाईट आणि स्वच्छता मोहिम यांसारखी अनेक विकासकामे पूर्ण झाली आहेत. उद्यान सुशोभीकरण ही त्याच मालिकेतील आणखी एक महत्त्वाची पायरी आहे.

यावेळी आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, शहराचा सर्वांगीण विकास हा आमचा प्राधान्यक्रम आहे. योग्य नियोजन, पारदर्शक कामकाज आणि नागरिकांच्या सहकार्याने अंबाजोगाईला राज्यातील आदर्श शहर बनवण्याचे ध्येय त्यांनी व्यक्त केले.

त्यांनी पुढे सांगितले की, शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, गार्डन, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता या सर्व प्रश्नांवर ठोस उपाययोजना राबवली जात आहे. नागरिकांना दर्जेदार सुविधा देणे हेच आमचे उद्दिष्ट असून, नगर पालिकेचा कारभार आमच्या हाती आल्यास हे शहर नव्या रूपात दिसेल, असेही त्या म्हणाल्या.

या समारंभाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, डॉ. नवनाथ घुगे, रोहिणी पाठक, विलास सोनवणे, हिंदुलाल काकडे, शेख रहीम, शोभाताई लोमटे, सारंग पुजारी, संजय गंभीरे, अतुल देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

योगेश्वरी मंदिर परिसरातील हे सुशोभीकरण काम अंबाजोगाईच्या धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणाला नवा उजाळा देणार असून, शहराच्या विकास प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

**अर्धवट सिमेंट ...**

अधिकारी ने या कामाचे बिल काढू नाही.असे नागरिकांनांने म्हटले आहे.

जर या चेंबर मुळे जिवंत हानी झाली तर संबंधित नगरपंचायत चे अधिकारी व गुत्तेदार जबाबदार राहातील असं वार्ड क्रं १६ मधील नागरिक बोलू लागले आहेत.

**दिंद्रुडमध्ये दीपोत्सव ...**

घेतला.मित्र परिवार तर सोबत होताच पण अनेकांनी यासाठी आम्हाला सहकार्य केले.त्या सर्वांना विशेष धन्यवाद - - परशुराम लांडे

### पान १ वरून...

गावातील तरुण काही चांगल करत आहेत, ज्यातून गावातही काही बदल घडत आहेत,दीपोत्सच्या माध्यमातून सर्व गावकरी एकत्र आले,एक सार्वजनिक स्तुत्य उपक्रम संपन्न झाला.याचा आम्हाला आनंद आहे, दूरदेशी असणारे हे सर्व जण आपल्या जन्मभूमीसाठी काही करत आहेत ही बाब खरोखर उत्तम आहे.या सर्व तरुण मित्रांना शुभेच्छा आणि अभिनंदन- संजय सपाटे

कवी, साहित्यिक.

सण आणि उत्सव हे आपल्या सर्वांसाठी एकत्र येण्याचे माध्यम आहेत,ज्यातून विचारांची देवाण घेवाण होते,मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दीपोत्सव आम्हा गावकऱ्यांना उत्साह देणारा ठरला आहे, मी आयोजक आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे धन्यवाद देतो की आपण या माध्यमातून गावात काही चांगले करत आहात - डॉ.दत्तात्रय भुजबळ

**दिवाळी संपताच ...**

हंगामाला वेग आला असून, धारूर तालुक्यातील मजूर मोठ्या संख्येने या कामासाठी स्थलांतरित होत आहेत.

सध्या खामगाव-पंढरपूर या मुख्य रस्त्यावर दररोज शंभर ते दीडशे ट्रॅक्टर आणि ट्रक उसतोडणी मजूर घेऊन दक्षिणेकडे रवाना होत आहेत. दिवसा प्रमाणेच रात्रीही हे स्थलांतर सुरू असल्याने रस्त्यांवर वाहनांची सततची वर्दळ सुरू आहे. काही कुटुंबे मुलाबाळांसह, जनावरे

### पान १ वरून...

आणि घरगुती वस्तू घेऊन निघाल्याने हे दृश्य भावनिक होत आहे.

तालुक्यातून दरवर्षी ६० ते ७० हजार मजूर स्थलांतर करतात. अनेक गावांमधून ७० ते ८० टक्के मजूर वर्ग बाहेर पडतो. हे लोक चार ते पाच महिने चालणाऱ्या उसतोडणीच्या हंगामात कारखान्यांवर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कापूस वेचणी, सोयाबीन आणि बाजरी मळणीच्या कामाला वेग आला असला तरी त्यातून मिळणारे उत्पन्न अपुरे असल्याने अल्पभूधारक शेतकरीही स्थलांतरास भाग पडतात.

या मजुरांना स्थलांतराचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे मुकादमाकडून घेतलेली उचल. अनेक मजूर दिवाळीपूर्वी मुकादमांकडून आगाऊ पैसे घेतात. त्याची परतफेड करण्यासाठी त्यांना मुकादम सांगेल त्या कारखान्याच्या उसतोडणीसाठी जावे लागते. अनेक वेळा या मजुरांना कठीण परिस्थितीत राहून काम करावे लागते, तरीही उपजीविकेचा पर्याय नसल्याने स्थलांतर टाळता येत नाही.

सध्या राज्यातील अनेक साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू झाले असून, मजुरांच्या उपलब्धतेसाठी मुकादमांनी गावागावांत संपर्क साधला आहे. परिणामी, धारूर तालुक्यातील अनेक गावे अक्षरशः ओस पडली आहेत, बाजारपेठा आणि ग्रामीण भागातील दैनंदिन हालचाली मंदावल्या आहेत

# आहेर चिंचोली येथील ८५ शेतकऱ्यांना नामच्या मोफत बियाण्यांचे वाटप- ॲड. अजित देशमुख



बीड ।प्रतिनिधी

आहेर चिंचोली या गावाला पुराच्या पाण्याने मोठा तडाखा बसला होता. बंधाऱ्या लगत आणि नदी किनारी असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच नदीचे पात्र देखील बदलले होते. या गावातील ८५ शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन माध्यमातून आलेले मोफत बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पुराच्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. नाम फाउंडेशनच्या वतीने पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना मोफत बियाण्याचे वाटप करण्याचे नियोजन ठरवण्यात आले होते. नाम फाउंडेशनने बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याचे उद्दिष्ट ठरवले होते.हरभरा आणि ज्वारी या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. चिंचोली गावचे रहिवासी ड. महादेव तुपे, ड. उमेश रकटे, तसेच ड बाळासाहेब गायकवाड, दिनकर सुरवसे पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच गणेश रकटे, संतराम चव्हाण, काशिनाथ सुरवसे, सुभाष काळे, कर्ण बहिर, भारत बहिर, रामनाथ सुरवसे, जनार्धन रकटे या आणि इतर शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना नाम फाउंडेशनचे आभार मानले.

## धनगर आरक्षण लढ्यासाठी स्वतः चे बलिदान देणारे आनंद कोकाटे यांच्या घरी

# मल्हार योद्धा दिपक भाऊ बोऱ्हाडे यांची सांत्वनपर भेट..!

बीड ।प्रतिनिधी

धनगर समाजाच्या आरक्षण लढ्यासाठी स्वतःचे बलिदान देणारे आनंद कोकाटे यांच्या निवासस्थानी जाऊन माजी समाज कल्याण सभापती कल्याणराव आबुज यांनी सांत्वन केले.

यावेळी युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस ड राजु शिंदे ,सरपंच कृष्णाजी पितळे, सरपंच बाळासाहेब मुळे, युवा मल्हार सेना जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर ढोरमारे ,गजानन जी काळे ,अशोक जी बोरकर ह भ प परमेश्वर महाराज वाघमोडे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सावळदबारा परिसरात जोरदार पावसाने कापूस ओलाचिब झाला

नुकसान भरपाई देण्यात यावी - गुलाबराव पाटील कोलते

सावळदबारा ।प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात जोरदार पाऊस झाला.या पावसाने शेतात पाणीच पाणी झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.साचलेल्या पाण्यात मका, कापशी, सोयाबीन, आदी पिकाचे ओलाचिब झाले आहेत.

या पावसात चारा भिजल्याने खराब झाला असून जनावरांच्या चाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय कपाशी पिकाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



सावळदबारा सह परिसरात झालेल्या नुकसानीची लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांनी केली आहे.

# बीड जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त गरीब कुटुंबांना किराणा किट व उबदार कंबल वाटप

बीड ।प्रतिनिधी

मुंबई येथील ज्येष्ठ विधीज्ञ श्री.दिनेश बी. खैरे (माजी मुख्य सरकारी वकील, मॅट कोर्ट, मुंबई) आणि त्यांचे सहकारी विधीज्ञ श्री. नरेंद्रजी राजपुरोहित सर, सह्याद्री समाज, मुंबई. यांच्या पुढाकारातून, तसेच रेणुका माऊली सेवाभावी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त गरीब कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला.



अतिवृष्टी, पावसामुळे आणि शेतमालाचे मोठे नुकसान झाल्याने अनेक हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली होती. या परिस्थितीत अनेक गरजू कुटुंबांना किराणा किट तसेच येणाऱ्या थंडीमध्ये उबदार कंबल व रग वाटप करण्यात आले.या उपक्रमात जिव्हाळा बेघर निवारा केंद्रचे समाजसेवक अभिजीत वैद्य आणि राजू वंजारे यांचे विशेष योगदान राहिले. हे दोघे समाजसेवक गेल्या अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यातील शेतकरी, गरीब कुटुंबे, पूरग्रस्त आणि बेघर लोकांसाठी सतत कार्यरत आहेत. मुंबईसह इतर शहरांतील दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून ते मदतीचे हात पुढे करत असतात.

नदी खोलीकरण, पूरग्रस्तांना मदत, गरीबांना किराणा किट वाटप, तसेच अनाथ आणि बेघरांना मागील आठ वर्षांपासून भाजी मंडई परिसरात निवारा आणि अन्न देण्याचे कार्य हे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र सतत करत आहे. शासनाच्या कोणत्याही निधीशिवाय समाजातील दुर्बल घटकांना प्रवाहात आणण्याचे हे कार्य सर्व स्तरांतून कौतुकास्पद ठरत आहे.

अशा प्रकारच्या सेवाभावी उपक्रमांमुळे समाजातील संवेदनशीलतेचा व मानवतेचा संदेश अधिक दृढ होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

## सार्वजनिक जागेचा गैरवापर कुठल्याही परिस्थितीत करु देणार नाही- सोमेश कदम

बीड । प्रतिनिधी

शहराच्या ज्ञानसंस्कृतीचं प्रतीक असलेलं हे वाचनालय फक्त वाचन आणि अभ्यासासाठीच देण्यात आलं होतं. मात्र, त्याच ठिकाणी व्यावसायिक उपक्रम राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे. कारण शहराच्या ओळखीचा अविभाज्य भाग असलेलं ए.एच. वाडीया सार्वजनिक वाचनालय आता विवादाच्या भोवर्यात अडकलं असून सदरील वाचनालयाच्या जागेवर व्यावसायिक व्यवहार सुरू करण्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव सोमेश्वर कदम यांनी करत संताप व्यक्त केला आहे.

वाडीया वाचनालय हे फक्त वाचन आणि अभ्यासासाठीच देण्यात आलं होतं. मात्र, त्याच ठिकाणी व्यावसायिक उपक्रम राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे. सार्वजनिक वाचनालयाच्या जागेचा व्यापारी वापर करणे हा गंभीर गुन्हा आहे.



वाचनालयाचे विश्वस्त इतर ट्रस्टमध्येही कार्यरत आहेत आणि त्यांनी नियम मोडले तर धर्मादाय आयुक्तांकडे औपचारिक तक्रार दाखल करणार असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

तसेच वाचनालयाची जागा जर व्यवसायासाठी वापरण्याचा प्रयत्न झाला तर मनसे रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन उभारेल. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## वडिलांचा वारसा चालविण्यासाठी विशाल गौंडर लढवणार सरपंच पदाची निवडणूक

दिंद्रुड ।प्रतिनिधी

दिंद्रुड ग्रामपंचायतचा कार्यकाल लवकरच संपत आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी आतापासूनच मोर्चे बांधणीला सुरुवात झाली आहे. थेट जनतेतून होणाऱ्या सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटले आहे. माजी सभापती कै. विजयकुमार गौंडर यांचे चिरंजीव विशाल गौंडर हे आपल्या वडिलांचा वारसा चालविण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास सज्ज झाले आहेत. त्यांनी सरपंच पदाची निवडणूक लढवावी अशी मागणी त्यांच्या समर्थकांसह जनतेतून केली जात आहे.

न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला निवडणुका घेण्यासाठी अखेरची तारीख सांगितली आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत या निवडणुका घ्या असं कोर्टाने म्हटलं आहे. त्यामुळे साहजिकच इच्छुकांच्या गोठात उत्साहाचे वातावरण आहे. माजलगाव तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायती पैकी एक असलेल्या दिंद्रुड ग्रामपंचायत निवडणुकीत विशाल विजयकुमार गौंडर हे सरपंच पदाचे उमेदवार असणार आहेत. थेट जनतेतून सरपंच पद निवडले जाणार असल्यामुळे ते केवळ सरपंच पदाची निवडणूक लढवतात की स्वतःच्या नेतृत्वाखाली पॅनल उभा करतात? हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी गौंडर यांच्या उमेदवारीची जनतेतून मागणी होत आहे.

स्वर्गीय विजयकुमार गौंडर यांनी सभापती पदाच्या काळात अनेक विकास कामे केली. तसेच सर्वसामान्य लोकांसाठी ते सदा सर्वकाळ उपलब्ध असत. त्यांचाच वारसा चालवण्यासाठी आपण निवडणुकीच्या मैदानात उतरत असल्याचे विशाल गौंडर यांनी सांगितले.

## जैतापूरच्या सरपंचाची गोरगरिबांना फराळ वाटप करून दिवाळी साजरी

दिंद्रुड ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जैतापुर येथील सरपंचांनी ग्रामपंचायत हद्दीतील गोरगरिबांसोबत दिवाळी फराळ वाटप करत दिवाळी साजरी केली. गेल्या सात वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

येथील सरपंच छाया भागवत दराडे या गेल्या सात वर्षांपासून जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील जैतापूर,देवठाणा, शेरी तांडा,सजगनी तांडा, नागझरी तांडा या भागातील गोरगरीब, निराधार व दिव्यांग ग्रामस्थांना प्रतिवर्षी दिवाळीच्या औचित्याने दिवाळी फराळ वाटप करतात. जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांश भाग हा ऊसतोड मजुरांचा परिसर आहे. या भागातील ऊसतोड मजूर ऊसतोडी ला गेल्यानंतर घरातील वयोवृद्ध निराधार व दिव्यांग नागरिकांना दिवाळीचा फराळ सहसा



मिळत नाही याच अनुषंगाने आपण सण साजरा करत असताना आपल्या गाव हद्दीतील ग्रामस्थांनी आनंदापासून वंचित राहू नये याकरिता आम्ही हा उपक्रम राबवत असल्याबाबत छाया भागवत दराडे यांनी माध्यमांना सांगितले. गावातील शालेय विद्यार्थ्यांना फटाके, कपडे, शालेय साहित्य दिवाळीच्या औचित्याने करण्यात येते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सौरभ शिवाजी नवलेचे चंदिगड विरुद्ध दमदार अर्ध शतक

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विरुद्ध चंदिगड रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत चंदिगड येथे महाराष्ट्र संघाने सर्व बाद ३१३ अशी धावसंख्या उभारली आहे.महाराष्ट्र संघाची सुरवात अडखळत अशी झाली. ८३ धाव संख्येवर ४ गडी बाद झाले होते. सलामी वीर पृथ्वी शॉ ८ रन्स काढून बाद झाला,सिद्धेश वीर ७ रन्स वर बाद झाला,अर्शिन कुलकर्णी याने ५५ चेंडू मध्ये ५५ धावा काढून बाद झाला. कर्णधार अंकित बावणे ८ धावा वर बाद झाला. महाराष्ट्राचा स्टार खेळाडू ऋतू राज गायकवाड आणि विकेट किपर सौरभ नवले या दोघांनी ६ व्या विकेट साठी १५२ धावाची भागीदारी करत ऋतुराज गायकवाड ने १६३ बॉल मध्ये ११६ रन्स केल्या. त्याला विकेटकिपर सौरभ नवलेने सुरेख साथ देत सौरभने १२२ चेंडूत ६६ धावा केल्या.त्यामध्ये ७ चौकार आणि




एक षटकारचा समावेश आहे. रामकृष्ण घोष याने ४९ बॉल मध्ये ३१ धावा, विकी ओस्तवाल याने ४४ चेंडूत १६ धावा केल्या.सौरभचे रणजी स्पर्धेत सातवे अर्धशतक झाले.सौरभने पहिल्या सामन्यात केरळ विरुद्ध ५ कॅच आणि एक उत्कृष्ट स्टॅम्पिंग करून केरळ विरुद्धचा सामना अनिर्णीत अवस्थेत संपला. बीड जिल्ह्याचा भूमिपुत्र सौरभच्या अष्टपैलू खेळीचे क्रिकेट प्रेमी कडून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## ह.भ.प.राजु महाराज लोखंडे व पत्रकार अण्णासाहेब साबळे यांचा मच्छिंद्रनाथ देवस्थानात गौरवपूर्ण सत्कार

आष्टी ।प्रतिनिधी

मच्छिंद्रनाथ महाराजांच्या पवित्र नगरीत भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळाला. मच्छिंद्रनाथ देवस्थान दर्शनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध ह. भ. प. राजु महाराज लोखंडे आणि प्रामाणिक व जनतेच्या समस्यांना आवाज देणारे पत्रकार अण्णासाहेब साबळे यांचा देवस्थान ट्रस्टतर्फे गलब व श्रीफळ देऊन मानाचा सत्कार करण्यात आला.



या सोहळ्यात देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब चितळे आणि सचिव बाळासाहेब मस्के यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी समाजसेवक बबनराव शिंदे, पोपट जाधव यांच्यासह अनेक भक्तजन उपस्थित होते. सत्कारावेळी उपस्थितांनी राजु महाराज लोखंडे यांच्या सहवासातून लाभलेल्या अध्यात्मिक अनुभवांचा, तसेच ५० वर्षांपूर्वी व ५० वर्षांनंतरही अचूक भाकीत सांगणाऱ्या त्यांच्या तर्कशक्तीचा गौरव केला. त्याचप्रमाणे पत्रकार अण्णासाहेब साबळे यांच्या सामाजिक बांधिलकी, निःस्वार्थ पत्रकारिता आणि लोकहितासाठीच्या कार्याचे सर्वांनी कौतुक केले. या प्रसंगी मच्छिंद्रनाथ देवस्थानात भक्ती, श्रद्धा आणि सेवेचा दिव्य संगम साकारला होता. वातावरणात भक्तीचा सुगंध दरवळत असताना उपस्थितांनी जय मच्छिंद्रनाथ च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला.



## आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी वंचित,शोषित,भटके-विमुक्त समाजासोबत दिवाळी पाडवा साजरा

आष्टी ।प्रतिनिधी

दिवाळी पाडव्यानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी वंचित, शोषित आणि भटके - विमुक्त समाजातील बांधवांसोबत दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजातील वंचित घटक मोठ्या उत्साहात आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी एकत्र आले होते. दीन दलित, वंचित शोषित, समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने दिवाळीचा हा अनोखा सोहळा गेल्या अनेक वर्षांपासून धस परिवार आयोजित करत आहे. आमदार सुरेश धस यांनी या निमित्ताने उपस्थितांशी संवाद साधत सांगितले की, शोषित - वंचित समाजघटकांच्या जीवनात उन्नतीची पहाट यावी, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलावे, हा आमचा सततचा प्रयत्न आहे.

त्यांचे वडील स्व. रामचंद्र दादा धस यांनी सुरू केलेल्या या परंपरेला आजही आमदार धस पुढे नेत आहेत. समाजातील बालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून स्वतःही आनंदित होणारे हे आगळेवेगळे व्यक्तिमत्व म्हणून आमदार धस ओळखले जातात.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष पदी शरद काळे यांची नियुक्ती

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई सोशल मिडिया तालुका अध्यक्ष पदी येथील धडाडीचे युवा कार्यकर्ते शरद काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील नियुक्ती ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांच्या आदेशाने तसेच पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण व माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती चे पत्र राजकिशोर मोदी व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अंबाजोगाई शहराध्यक्ष महादेव आदमाणे यांच्या उपस्थितीमध्ये शुक्रवार दि २४ रोजी देण्यात आले. यावेळी किशोर परदेशी, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, कचरू सारडा, प्रकाश लखेरा, सुशील वाघमारे, शेख मुक्तार , अंकुश हेडे , मतीन जरगर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

शरद काळे यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे की आपण राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विचारधारेवर दृढ श्रद्धा ठेवून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहात. शिव-शाहू-फुले-आंबेडकर व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना.श्री. अजितदादा पवार साहेब यांचे विचार व पक्षाची विचारधारा सर्वत्र पोहोचवण्यासाठी, डिजिटल माध्यमांवरील उपस्थिती वाढविणे, युवकांना जोडणे तसेच समाज माध्यमांमध्ये पक्षाची धोरणे व कार्यक्रम हे सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या हेतून आपण काम करत आहात. आपल्या या कार्यास आणखीन पाठबळ मिळण्यासाठी आपली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंदजी पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर (आबा) चव्हाण यांच्या मान्यतेने माजी नगराध्यक्ष राजकिशोरजी मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

आपणास दिलेल्या जवाबदारीचा तसेच आपण आपल्या पदाचा कार्यकाळ प्रामाणिकपणे, जबाबदारीने व पक्षनिष्ठेने कार्य पार पाडाल अशी अपेक्षा देखील व्यक्त करण्यात आली आहे. याप्रसंगी शरद काळे यांना शुभेच्छा देताना राजकिशोर मोदी यांनी सध्याचा सोशल मीडिया हा समाजाचा आरसा



बनू पहात आहे. त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियाचा वापर अतिशय जाणीवपूर्वक व काळजी पूर्वक वापर करावा . आपल्या सोशल मीडियावरील एखादा मचकूर ज्याने समाजसमाजात तेड निर्माण होणार काही दक्षता घेण्याचे आवाहन याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी उपस्थित तरुणांना केले. यावेळी शहराध्यक्ष महादेव आदमाणे यांनी देखील शरद काळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शरद काळे यांना सोशल मिडिया अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देतांना अकबर पठाण, जावेद गवळी, महेबूब गवळी, दत्ता सरवदे,खलील जाफरी, शाकेर काझी, रफिक गवळी, सुशील जोशी, सय्यद ताहेर, मुनिर शाह, पवन टेकाळे, अस्लम पठाण , रोहित हुलगुंडे, सन्नि लखेरा यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वडवणी तालुक्याच्या लेकीचा बळी घेणाऱ्या आरोपींना फाशी द्या : अशोक निपटे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मुख्यमंत्र्याकडे मागणी

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकरी कन्या असलेल्या डॉक्टर संपदा मुंडे या मुलीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या नराधमांना तत्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने वडवणी तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनातून मागणी करण्यात आली की वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची मुलगी असलेली डॉक्टर संपदा हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करीत मोठ्या धैर्याने शिक्षण घेतलं होतं. डॉक्टर झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात नोकरी लागली होती मात्र तेथील पोलीस अधिकाऱ्याने तिचा जाणीवपूर्वक छळ



केला. वेळोवेळी झालेल्या छळाला वाचा फोडण्यासाठी तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. मात्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देखील लक्ष दिल नाही. वरिष्ठांकडे तक्रार केल्याचे माहिती झाल्यानंतर फलटणच्या पोलिसांनी तिला अधिकच त्रास देणे सुरू केले. या त्रासाला कंटाळून तिने अखेर आत्महत्या केली. तिच्या आत्महत्यास कारणीभूत ठरलेले पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष अशोक निपटे यांनी पोलीस प्रशासन आणि शासकीय यंत्रणेवर कडाडून टीका केली. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे सर, डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतीश मुजमुले, पत्रकार संघाचे तालुका सचिव अर्जुन मुंडे, ज्ञानेश्वर लंगे, अशोक फपाळ, प्राध्यापक सोमेश्वर कोठुळे, शंकर झाडे,शेख एजाज, विष्णू डोईफोडे, संपादक हनुमंत म्हात्रे, भैय्यासाहेब काकडे, शांतिनाथ जैन, गंगाभिष्म अंडील आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी तहसीलदार मंगेश बुचडे यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र आता गुन्हेगारांचं राज्य: प्रा. काकडे

पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास काकडे सर यांनी देखील यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना महाराष्ट्र राज्यातील महिला मुलीवर होणाऱ्या अत्याचारांची मालिका सांगितली. महाराष्ट्र राज्य हे गुन्हेगारांचा राज्य झाल आहे. या राज्यात लेकीबाळी आता सुरक्षित राहिलेल्या नाहीत. असा थेट आरोप करीत त्यांनी राज्याचे गृहमंत्री असलेले मुख्यमंत्री बघ्यांच्या भूमिकेत दिसत आहेत. अशी टीका त्यांनी केली.

# वारणी ग्रामस्थांनी केला दीपावली पाडव्याला यशस्वी भूमिपुत्रांचा सत्कार

मानूर / शाहेबाज पठाण

शिरूर कासार तालुक्यातील वारणी गावामध्ये प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी भूमीपुत्रांचा नगरी सत्कार दि. २२ ऑक्टोबर रोजी हा सोहळा पाडव्याच्या शुभमुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडला, गेली बारा वर्षापासून ही परंपरा बारणी गावाने जपली आहे. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष भास्कर तात्या केदार यांनी हा कार्यक्रम सुरू केलेला असुन यामध्ये वारणी गावातील संपूर्ण पदाधिकारी व ग्रामस्थ गट-तट व मतभेद विसरून या कार्यक्रमात एकत्र येऊन भूमीपुत्रांचा दरवर्षी सत्कार करतात. वर्षभरात नव्याने शासकीय सेवेत रुजू झालेले,व. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात पुरस्कार प्राप्त, सेवानिवृत्त कर्मचारी, प्रगतशील शेतकरी यांचा नागरी साकार केला जातो.



गावाकडून भूमीपुत्रांचा नागरी

सत्कार होत असल्याने गावातील तरुण वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण असते. गावाकडून प्रेरणा प्रोत्साहन व पाठबळ मिळत असल्याने शासकीय सेवेसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भूमीपुत्रांची संख्या वर्षोनुवर्षे वाढत आहे. हा उपक्रम पंचक्रोशीतील सर्वच गावांना आदर्श घेण्यासारखा आहे. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वारणी गावचे सरपंच ज्ञानदेव केदार हे होते तर प्रमुख पाहुणे माजी सभापती बाबुराव केदार होते. संकल्पक भास्कर तात्या केदार यांनी सूत्रसंचालन केले तर गावातील आदर्श शिक्षक रविंद्र केदार, बालविकास अधिकारी कालिदास बडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच गावचे प्रतिष्ठित नागरिक बाबासाहेब केदार, भा.ज.प. तालुकाध्यक्ष सरचिटणीस एम एन बडे, मा. उपसरपंच एकनाथ केदार, चेअरमन विनायकराव बडे, एकनाथ केदार, कुमार बडे, साहेब कामलेश केदार, सचिन मिसाळ, विष्णू केदार फौजी, अविनाश केदार, प्रा. भागवत केदार, बाळासाहेब केदार उपस्थित होते व कार्यक्रमांचे आभार एकनाथ केदार यांनी मानले. यावेळी यशस्वी झालेल्या दीपक गर्जे, कृष्णकांत केदार, धीरज केदार, स्नेहल केदार, संकेत नागरगोजे, विशाल केदार, सुशील केदार, प्रदीप केदार, विवेक केदार, संदीप केदार, ओंकार केदार, आरती जगताप, मनीषा केदार, भागवत केदार, वैष्णवी केदार, जयेश केदार, संकेत केदार, कार्तिक डोंगरे, काव्या बडे, आजिनाथ केदार, राधिका सानप, अंबादास केदार, डॉ नीलम बडे, अविनाश गीते, गणेश गर्जे , बाळू केदार, रवींद्र केदार, गणेश बडे, बाबासाहेब बडे, पोपट डोळे, सागर केदार, बाबासाहेब केदार, दादासाहेब डोंगरे, आजिनाथ केदार, मधुकर केदार , शरद केदार, ज्ञानेश्वर केदार, सुरेश डोंगरे, आदी यशस्वी भूमिपुत्रांचा ग्रामस्थांनी मोठ्या जल्लोषांमध्ये सत्कार केला याप्रसंगी गावातील व परिसरातील असंख्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# पत्रकार अविनाश कदम यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने व विविध मान्यवरांनी केला शुभेच्छांचा वर्षाव

सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांच्या सेवेसाठी कायम कार्यरत राहणार - अविनाश कदम

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी शहरांसह तालुक्यात माझ्या संपर्कात आलेल्या प्रत्येकानेच आपल्यावर मनापासून प्रेम केले असून या प्रेमाची शिदोरी घेत आपण कार्यरत आहोत. यापुढेही समाजसेवा करीत आणि पत्रकार म्हणून सर्वांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास आष्टी युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै लोकमत, मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांनी व्यक्त केला. दरम्यान मित्र परिवाराच्या वतीने व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

पत्रकार अविनाश कदम यांचा वाढदिवस २१ ऑक्टोबर रोजी आष्टी शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर विविध ठिकाणी वाढदिवसानिमित्त अविनाश कदम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना पत्रकार अविनाश



कदम यांनी सांगितले की, आष्टी शहरांसह तालुक्यातील नागरिकांनी व मित्र परिवार, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्यावर मनापासून प्रेम असून मी एक पत्रकार म्हणून सर्वांसाठी जे शक्य आहे ते आपल्या सामाजिक कार्याच्या व लेखनीच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले आशिर्वाद आणि सहकार्य माझ्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे असून यापुढेही आपल्या सेवेत अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास पत्रकार कदम यांनी व्यक्त केला. आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार सुरेश धस,माजी आ. भिमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. बाळासाहेब आजबे, तहसीलदार वैशाली पाटील, शिवसेनेच्या नेत्या रेश्माताई जगताप, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सतिश शिंदे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, गटशिक्षणाधिकारी सीमा काळे यांच्यासह राजकीय व अधिकारी, सरपंच, उपसरपंच, शैक्षणिक, सामाजिक, संपादक, धार्मिक, पत्रकार आदी क्षेत्रांतील मान्यवरांनी व मित्र परिवार यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, भ्रमणध्वनी, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# वडवणी येथे महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा संपन्न

## २० वर्षानंतर गत आठवणींना मिळाला उजाळा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्वीच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याबाबत अधिक माहिती अशी की,महाराणी ताराबाई कन्या शाळेतील शैक्षणिक वर्ष - २००४-०५ मधील एस.एस.सी. बॅच च्या माजी विद्यार्थिनींचा शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी तब्बल २० वर्षानंतर महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्नेह मेळाव्याचे (गेट-टुगेदर) आयोजन श्रीमती अंजली आंधळे यांनी केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून वडवणी पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.सुलोचना



आंधळे,विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती एस.के आंधळे /डोईफोडे, सेवानिवृत्त प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,श्री.धस सर , श्री.डोईफोडे सर,श्री.चोले सर,श्री.घोळवे सर,श्रीमती जवंजावळ मॅडम ,श्रीमती फलके मॅडम अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते मान्यवरांवर पुष्पवृष्टी करून माजी विद्यार्थिनींनी स्वागत केले.

मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रोहिणी शिनगारे,अंजली मस्के,आम्रपाली मस्के,अश्विनी वखरे यांनी स्वागतगीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. आम्रपाली मस्के,रोहिणी रावदाने, सीमा जाधव,रोहिणी अंकुशे,आशा आळणे या माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर ,श्रीमती जवंजावळ मॅडम श्रीमती फलके मॅडम,श्री.डोईफोडे सर ,प्राचार्या शोभाताई आंधळे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले.


अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की, प्रामाणिकपणे वागणाऱ्या व्यक्तींना जीवनात त्रास होतो हे खरे आहे पण आत्मिक समाधान त्यांना मिळत असते प्रमाणिकपणे राहिलो म्हणूनच मी आमदार झालो असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थिनींना केले.

गेट-टुगेदर चा कार्यक्रम दोन सत्रामध्ये संपन्न झाला दुसऱ्या सत्रात संगीत-खुर्ची,तळ्यात- मळ्यात हे खेळ खेळण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती काळे,सरिता माळवदे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक रोहिणी शिनगारे व कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार अंजली आंधळे यांनी मानले. आनंददायी वातावरणामध्ये स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# आर्वी येथील महादेव नन्नवरे यांचे दुःखत निधन

मानूर ।प्रतिनिधी

आर्वी येथील जेष्ठ नागरिक तथा समाजातील आदरणीय व्यक्तिमत्त्व महादेव बापुराव नन्नवरे (वय ६२) यांचे शनिवार (ता. २५) रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आर्वी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



नन्नवरे यांनी आयुष्यभर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची भावना जपली. त्यांचा स्वभाव मितभाषी, परंतु मदतीस तत्पर असा होता. गावातील सामाजिक आणि धार्मिक उपक्रमात त्यांचा नेहमी सहभाग असे. त्यांनी आपल्या वागणुकीतून सर्वांशी आपुलकीचे नाते निर्माण केले होते. त्यामुळे त्यांचा मोठा स्नेहवर्तुळ तयार झाला होता.

त्यांच्यावर आर्वी येथे शनिवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी नातेवाईक, ग्रामस्थ, सामाजिक, राजकीय, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यांच्या पश्चात चार भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते शिरूरकासार मराठी पत्रकार परिषद तालुका अध्यक्ष जालिंदर नन्नवरे यांचे वडील होत.त्यांच्या निधनाने नन्नवरे कुटुंबावर शोककळा पसरली असून सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# दत्त मंदिरात राजस्थानी समाजाकडून अन्नकूट सोहळा संपन्न

## आरती व ५६ भोग अर्पण करून महाप्रसादास सुरुवात

अंबेजागोई ।प्रतिनिधी

अंबेजागोई शहरातील हौसींग सोसायटी येथील दत्त मंदिरात दरवर्षी प्रमाणे यंदाही दिवाळीनंतरचा पारंपारिक अन्नकुट महोत्सव अंत्यत भक्तीभावाने आणि उत्साहात संपन्न झाला. गुरुवारी सायंकाळी आयोजीत या कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ठीक पाच वाजता व्यंकटेश(बालाजी ) ची आरती समाजातील मान्यवराच्या हस्ते पार पडली यानंतर लगेच पारंपारिक पद्धतीने बनवलेला ५६ भोगांचा नैवेद्य दाखवून हा सोहळा पार पडला. यानंतर महाप्रसाद वितरण सोहळ्याला सुरुवात झाली.

सर्व भक्तांनी या महाप्रसादाचा आस्वाद भक्तीभावाने घेतला व या मंगल क्षणाचा आनंद घेतला. महाप्रसादास सुरुवात झाल्यानंतर थोड्या वेळाने वरूण राजाने सुद्धा आपली हजेरी लावली होती. तरीही उपस्थित सर्व भक्तानी मोठ्या भक्तीभावाने अन्नकुट या महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी समाजातील सर्व पदाधिकारी, युवावर्ग तसेच महिला मंडळ कार्यकर्त्यानी तसेच बालगोपालानीही एकत्र येऊन नियोजनबद्ध पद्धतीने कार्य केले.





# नैसर्गिक संकटात बळीराजाला दिलासा

श्रीक्षेत्र पावनधाम संस्थानचा पुढाकार ५१ शेतकऱ्यांना मोफत हरभरा बियाण्यांचे वाटप

केज/प्रतिनिधी

नैसर्गिक संकटात श्री क्षेत्र पावनधाम संस्थान ने बळी राजाला दिलासा दिला असून धारुर तालुक्यातील ५१ शेतकरी बांधवांना हरभरा बियाणे वाटप करुन दिलासा दिला आहे.याबाबतीत सविस्तर माहिती अशी की,शेतकऱ्यांवर यंदाच्या अतिवृष्टीचे प्रचंड संकट कोसळले असून,शेतीचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे.पिकांचे नुकसान,मातीची धूप आणि आर्थिकअडचणींनी त्रस्त झालेल्या अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी श्री जगद्गुरू तुकोबाराय पावन धाम संस्थान,औरंगपुर ता.केज,जि.बीड यांच्या वतीने मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

या सामाजिक बांधिलकी च्या उपक्रमा अंतर्गत ५१ शेतकऱ्यांना मोफत हरभरा बियाण्यांचे वाटप करण्यात आले.प्रत्येक शेतकऱ्याला प्रति एकर २० किलो बियाणे देण्यात आले.हा उपक्रम दिनांक २४ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता धारुर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला.

या उपक्रमाचे आयोजन महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री (श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम संस्थान)यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या वेळी विविध सामाजिक,औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी सुभद्रा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज,पुणे, तसेच नामदेव इंदरराव गोरे,संजय गोपाळराव देशपांडे,एम.एस.दत्ता, सुधीर कोसलगे,ज्ञानेश्वर हिवरेकर,जालिंदर भाऊ कुटे आणि दिनेश शेठ सुराणा यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला प्राचार्य गोपाळ काकडे,प्रकाश करपे,वैभव कोटूळे, बाळासाहेब खामकर, कुंभार सर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.अतिवृष्टी मुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतीला पुन्हा उभारी देण्यासाठी करण्यात आलेला हा उपक्रम ग्रामीण भागात आशेचा किरण ठरला आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटली असून, समाजातील संस्थात्मक सहकार्याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

बळीराजा हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणाआहे. त्याच्या अडचणीच्या काळात समाजाने त्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सेवा आहे, असे मत महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे यांनी व्यक्त केले.हा उपक्रम केवळ बियाण्यांचे वाटप न राहता बळीराजाच्या आत्मविश्वासाला दिलेला नवसंजीवनीचा हात ठरला आहे.यावेळी लाभार्थी बळीराजाने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मानवतेचा हात; महिंद्रा अँड महिंद्रा असोसिएट यूनियनचा संवेदनशील उपक्रम!

## मराठवाड्यातील पूरग्रस्त मयत शेतकरी कुटुंबांना दिला मदतीचा हात

परळी ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातून उदरनिर्वाहासाठी पुणे येथे स्थायिक झालेले आणि आपल्या कष्टाच्या बळावर सुखी संसार उभा करणारे महिंद्रा अँड महिंद्रा असोसिएट यूनियन, चाकण, पुणे येथील कामगार वर्गाने समाजाप्रती असलेली जबाबदारी मनापासून पार पाडली आहे. यंदाच्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात अनेक कुटुंबांवर संकट कोसळले. त्यातच ममदापुर (ता. परळी, जि. बीड) येथील शिवराज माणिकराव कदम यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात कुटुंबावर ओढवलेल्या दुःखाच्या काळात या कुटुंबाला जगण्यासाठीचा आर्थिक आधार देत महिंद्रा अँड महिंद्रा असोसिएट यूनियनने एक संवेदनशील उदाहरण घालून दिले आहे.

या मदतीचा धनादेश मयत शिवराज कदम यांच्या वडिलांना व मुलाला युनियनचे अध्यक्ष प्रदीप तळेकर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. या वेळी संतोष अंधारे, दत्ता खांदवे, विशाल सोनवणे व पंजाब जगताप हे सहकारी उपस्थित होते.या उपक्रमातून एक हृदयस्पर्शी संदेश देण्यात आला. कामाच्या ठिकाणी मिळवलेली प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा ती समाजातील गरजूंना हात देण्यासाठी वापरली जाते. महिंद्रा अँड महिंद्रा असोसिएट यूनियनचा हा उपक्रम केवळ आर्थिक मदत नसून, ती मानवतेच्या नात्याची सजीव जाणीव आहे. कष्टातून उभं राहून इतरांना दिलासा देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

१५ कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत

बीड जिल्ह्यातील चार, धाराशिव जिल्ह्यातील पाच, सोलापूर जिल्ह्यातील तीन, लातूर जिल्ह्यातील तीन, कुटुंबांना महिंद्रा अँड महिंद्रा असोसिएट यूनियनच्या वतीने पूरग्रस्त मयत शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना प्रत्येकी ५० हजार रुपये प्रमाणे मदत दिली आहे. या उपक्रमामुळे पूरग्रस्त मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आधार मिळाला आहे.

# केज तालुका काँग्रेसच्या अल्पसंख्याक अध्यक्षपदी ॲड.अजमेर शेख यांची निवड,खा.रजनीताई पाटील यांनी केले स्वागत

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील ड.अजमेर सादेक शेख यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या केज तालुका अल्पसंख्याक अध्यक्षपदी शनिवारी दि.२५ऑक्टोबर रोजी निवड करण्यात आली आहे.ही निवड भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या तथा खा.रजनीताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी माजी मंत्री अशोकराव पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील,बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष असिफोद्दीन खतीब यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण बापु शेप, बाळासाहेब ठोंबरे,प्रताप मोरे सर,विश्वजीत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित



होते.दरम्यान, ड.अजमेर शेख यांचे उच्चशिक्षण दिल्ली येथे झालेले असून कायद्याचे शिक्षणही घेतलेले आहे. होळ येथे त्यांनी गेल्या १० वर्षांपासून स्वतःचे मोफत ग्रंथालय व कोचिंग क्लासेस चालवित आहेत. तसेच,सातत्याने समाज माध्यमातून अल्प संख्याकांच्या प्रश्नावर आवाज उठवत असतात. आता त्यांनी राजकारणात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला असून काँग्रेस पक्षातून राजकीयकार्याला सुरुवात केली आहे. मान्यवरांनी ड.अजमेर शेख यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# बदनापूर-संभाजीनगर रोडवरील गॅलेक्सी हॉटेल,आकाश हॉटेलवर देहविक्रीचा धंदा सुरु ? पोलिस प्रशासनाचे संशयास्पद मौन

जालना ।प्रतिनिधी

बदनापूर-संभाजीनगर रोडवरील गॅलेक्सी हॉटेल व आकाश हॉटेल हे ठिकाण सध्या चर्चेचा विषय बनले आहे. परिसरातील नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे की या हॉटेलमध्ये देहविक्रीचा अनैतिक व्यवसाय खुलेआम सुरू असून बाहेर जिल्ह्यातील तसेच परराज्यातील महिला आणि तरुणींना या ठिकाणी आणून देहव्यवसायाच्या दलदलीत ढकलले जात आहे.रात्री उशिरापर्यंत येथे अनोळखी व्यक्तींची सततची वर्दळ वेगवेगळ्या गाड्यांची ये-जा संशयास्पद हालचाली आणि हॉटेलमधील बंद दरवाज्यांमागे सुरू असलेली गुप्त हालचाल यामुळे परिसरातील नागरिक चिंतेत आहेत. तरीसुद्धा स्थानिक पोलीस प्रशासन



या घडामोडीकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे, ही बाब अधिकच संशयास्पद ठरत आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचा प्रश्न एकच गावात सामान्य नागरिकांवर नियमांचे फास घट्ट केले जातात पण अशा उघड अवैध धंद्यावर पोलीस प्रशासनाचे डोळे का मिटतात ?

आकाश हॉटेल,

गॅलेक्सी हॉटेलवर चालणाऱ्या या गैरकृत्यामुळे महिला सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे तसेच तरुण पिढीला वाम मार्गावर नेण्याचे गंभीर षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत असताना, अशा अवैध धंद्यांवर तातडीने कठोर कारवाई व्हावी अशी मागणी सर्वत्र होत आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की महिलांचा सन्मान आणि समाजातील नैतिकता जपायची असेल

तर या हॉटेलमागील पाठबळ कोणाचे ? याची सखोल चौकशी झालीच पाहिजे.या हॉटेलच्या माध्यमातून महिला व तरुणींच्या आयुष्याशी खेळ केला जातोय, ही बाब गंभीर आहे. त्यामुळे दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून अशा अनैतिक व्यावसायिक साखळीला आळा घालावा अशी ठाम मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चिंचोली सर्कल मधून शिवसेनेकडून डॉ. लक्ष्मण जाधव निवडणुक लढविण्यास इच्छुक.

घनसावंगी ।प्रतिनिधी

सध्या घनसावंगी तालुक्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हापरिष व पंचायत समिती निवडणुकीसाठी जोरदार मोर्चबांधणी सुरू असून चिंचोली जिल्हापरिषद सर्कल मधून शिवसेना (शिंदे गटाकडून) वडीरामसगाव येथील



प्रसिद्ध डॉक्टर लक्ष्मण त्रिंबकराव जाधव हे इच्छुक असून घनसावंगी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार हिकमत दादा उढाण यांनी संधी दिल्यास चिंचोली सर्कल मधून मोठ्या मताधिक्याने निवडून येऊन जिल्हापरिषदच्या माध्यमातून चिंचोली सर्कलचा विकास साध्य करण्याचा मानस व्यक्त केला असून डॉ. लक्ष्मण जाधव यांचा चिंचोली सर्कल मध्ये चांगला जनसंपर्क असल्याने त्यांना प्रत्येक गावातून निवडणु लढण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

# लोकशाही न्यूज चॅनेलचे पत्रकार सुरेश वायभट यांचे अल्पशा आजाराने निधन



पैठण ।प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील वडवाळी गावचे रहिवासी लोकशाही न्युज चँनलचे तालुका पैठण प्रतिनिधि सुरेश जनार्धन वायभट वय (३६) यांचे अल्पशा आजाराने दुःख निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुले असा परिवार आहे त्यांचावर शनिवारी रात्रि दहा वाजता वडवाळी येथील मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कुष्णुर एमआयडीसी अंतर्गत चार कंपन्यांच्या धुरामुळे दुर्गंधीयुक्त वास नागरिक त्रस्त

नायगाव प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत परिसरातील मौजे कुष्णुर येथील एमआयडीसी मधील चार कंपन्यांच्या दुर्गंधीयुक्त व वासयुक्त पाण्यामुळे सर्वत्र दुर्गंधी येत आहे . त्यामुळे नागरिकांचे आरोग्यास परिणाम होत आहे .मात्र महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन सदर कंपनी मार्फत सोडल्या जाणारा कार्बन डाय-ऑक्साइड असो व अन्य पदार्थामुळे सर्वत्र दुर्गंधी वास येत आहे . त्यामध्ये एमआयडीसी कुष्णुर यामध्ये संत्र्यांच्या घाणीचे साम्राज्य पसरून यामुळे सर्वत्र रस्त्याच्या कडेलाच मोसंबी व संत्र्यांच्या टरफल पडून सर्व वास दुर्गंधी पसरत आहे. दुर्गंधी येत आहे त्याचबरोबर कीर्ती गोल्ड हे सोयाबीन युक्त कंपनी तेल बनवणाऱ्या कंपनीचा सुद्धा परिसरात दुर्गंधी वास येत आहे. तिसरी कंपनी व्यंकेज इंडिया या कंपनीमध्ये बरबडा नाल्यात पाणी सुद्धा दुर्गंधी वास येत आहे. कंपनी घाण पाणीही परिसरातील ओढ्या व नाल्यांमध्ये जात आहे. त्यामुळे वीहिर व नाल्याला पुन्हा ह्या दुर्गंधी वास ,घाणीचे साम्राज्य पसरत आहे. अशा या कंपन्यामुळे परिसरातील एमआयडीसी परिसरातील बरबडा सर्कल अंतर्गत येणाऱ्या नागरिक त्रस्त झाले आहेत. वरिष्ठ अधिकारी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सदर कंपन्यांत होत असणाऱ्या दुर्गंधी व घाण वास येतो पदार्थ बंद करण्यात यावे त्यामुळे नागरिकांचे अरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे आरोग्यास काही परिणाम होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावे अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांच्या वतीने केली आहे.

# तब्बल ६३ वर्षांनंतर भोकर पंचायत समितीवर अनुसूचित जातीच्या महिलेस सभापती पदाची संधी!

भोकर :तालुक्यातील राजकीय रंगमंचावर ऐतिहासिक क्षण येऊन ठेपला आहे. तब्बल ६३ वर्षांनंतर म्हणजेच १९६२ नंतर प्रथमच भोकर पंचायत समितीच्या सभापती पदासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेला संधी उपलब्ध झाली आहे.

पहिली पंचायत समिती निवडणूक १९६२ साली झाली होती. त्यावेळी अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवार सभापती झाले होते. आता २०२५ मध्ये पुन्हा या प्रवर्गातील महिला सभापती पदासाठी आरक्षण निश्चित झाले आहे.

निवडणूक आयोगाच्या गण निहाय आरक्षण सोडतीत देवठाणा (गण क्रमांक ५३) हा गण अनुसूचित जाती (सर्वसाधारण) करिता खुला झाला आहे. त्यामुळे या गणातून पुरुष किंवा महिला दोघांनाही उमेदवारीची संधी आहे.

मात्र सभापती पद हे विशेषतः अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असल्याने निवडणुकीत काही विसंगती निर्माण झाली आहे. जर संबंधित गणातून पुरुष उमेदवार निवडून आले तर ते सभापती पदासाठी अपात्र ठरणार असून, त्यामुळे सभापती पदाची खुर्ची रिकामी राहण्याचा पेच निर्माण होऊ शकतो.

या परिस्थितीमुळे सर्वच राजकीय पक्ष, अपक्ष उमेदवार व मतदारांचे लक्ष आता या गणातील निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहीले आहे. योग्य महिलेला उमेदवारी देऊन पंचायत समितीला वास्तविक सामाजिक न्यायाचा चेहरा मिळावा, अशी सर्व सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

तालुक्यातील राजकीय रंगमंचावर ऐतिहासिक क्षण येऊन ठेपला आहे. तब्बल ६३ वर्षांनंतर म्हणजेच १९६२ नंतर प्रथमच भोकर पंचायत समितीच्या सभापती पदासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेला संधी उपलब्ध झाली आहे.

# शिरूर पोलिस स्टेशनच्या हाद्दीतील जाटवड या गावांमध्ये एका वृध्द व्यक्तीला व त्याच्या कुटूंबीयाला जीव मारण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी । शिरूर कासार

भर दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी घडला थरारक शिरूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक साहेब आपण या वृध्द बाबाला व त्यांच्या मुलीला व कुटूंबीयांना न्याय देणार का ?

शिरूर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील गाव जाटवड मानुर तालुका शिरूर कासार या गावांमध्ये भर दिवाळी भाऊबीजच्या दिवशी भाऊकीतील लोकांनी भगिनाथ पाटीलबा पाखरे . अंबादास भागिनाथ पाखरे . शोभाबाई भागिनाथ पाखरे . शिवनाथ भागिनाथ पाखरे . या त्यांच्या भावकीतील लोकांनी मिळून एका वृद्ध बाबाला व त्यांच्या अहिल्यानगर येथील वैशाली बडे या लेकीला व त्यांच्या मुलगा लक्ष्मण पारखे व त्यांच्या पत्नीला व सुनेला या सर्व मंडळीला या आरोपीने हातात लाट्या . काठ्या . कुराडी घेऊन असे मोठे मोठे शस्त्र घेऊन जीव मारण्याचा प्रयत्न केला . स्वतःच्या वडिलांना मारू नका असे म्हणताना त्यांच्या लेकीचा वैशालीताई बडे यांचा या आरोपींकडून विनयभंगाचा प्रकार देखील घडल्याचे समोर आले आहे . हा थरारक प्रकार भर दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी घडला यामुळे शिरूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था थोडी तरी शिल्लक आहे का ? नाही हाच प्रश्न आता नागरिकांना पडला आहे . सध्या पारखे कुटुंब भयभीत झाले असून त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत . या कडे शिरूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जाधव साहेब हे लक्ष देतील का? नाही म्हणू आता असा प्रश्न पडला आहे की शिरूर पोलीस स्टेशनचे



पोलीस निरीक्षक जाधव साहेब या वृद्ध बाबाला व त्यांच्या लेकीला . व त्यांच्या सुनेला व त्यांच्या मुलीला न्याय मिळवून देतील का? हाणामाऱ्या करणाऱ्या व विनयभंग करणाऱ्या अशा आरोपीवर कडक कायदेशीर कार्यवाही करतील का? त्यांना लगेचच सोडून देतील का? हा प्रश्न देखील उपस्थित होत आहे . म्हणून या आरोपीवर तात्काळ कडक कार्यवाही करण्यात यावी . नसता पारखे कुटूंबीय जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कावंत साहेब यांची भेट घेऊन त्यांना न्याय मागणार असल्याचेही बोलले जात आहे . आता या महत्वाच्या गंभीर बाबीवर शिरूर कासारचे पोलीस निरीक्षक जाधव साहेब कशाप्रकारे हे प्रकरण हाताळून पारखे बाबांना व त्यांच्या अहिल्यानगर यंथील असलेल्या वैशालीताई या लेकीला व त्यांचा मुलगा लक्ष्मण भैय्या यांना व त्यांच्या मातोश्रीला न्याय मिळवून देतील का ? हे पाहणे येणाऱ्या काळामध्ये गरजेचे आहे

# मा.मुख्यमंत्री साहेब या डॉ .मुंडेना न्याय द्या नसता आरोपी जगण्यालायक राहाणार नाही

## अँटि करप्शन ब्युरो ऑफ इंडिया बीड जिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर

प्रतिनिधी । सातारा

साताऱ्यात अत्याचारग्रस्त महिला डॉक्टरने आत्महत्या केली. वास्तविक तिने तक्रारी करूनही त्याची दखल घेतली गेली नव्हती. शिवाय पोलिसानेच अत्याचार केला. आरोपी फरार आहे. हे सर्व भयंकर आहे. गृहखात्याचे व सार्वजनिक आरोग्य खात्याचे संपूर्ण अपयश दाखवणारी ही घटना. याबाबतीत माध्यमांनी सखोल वार्तांकन करून सरकारला अक्षरशः फोडून काढले पाहिजे. परंतु प्रत्यक्षात काय झाले? 'संशयित पोलिसांच्या निलंबनाचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेच दिला' ही बातमी ठळकपणे चालवण्यात आली. त्यानंतर महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आणि भाजपच्या महिला नेत्या चित्रा वाघ यांचे सविस्तर बाइट्स दाखवण्यात आले. सरकार किती तत्परतेने कारवाई करते, असे चित्र निर्माण करण्यात आले. परंतु मुळात या सरकारच्या डोळ्यांदेखत अत्याचार होत आहेत. आत्महत्येनंतर गुन्हा नोंदवण्यासही उशीर करण्यात आला, अशी तक्रार आहे. बदलापुरात असेच घडले होते. आता साताराकांडाबद्दलच्या चॅनेलवरील बातम्यांत विरोधकांच्या प्रतिक्रिया कमी प्रमाणात आणि त्याही बातमीच्या उत्तरार्धात दाखवण्यात आल्या. बातम्यांचा फोकस मुख्यमंत्री कम गृहमंत्री आणि महिला आयोग किती कार्यक्षमतेने कारवाई करतात, हे दाखवण्यावरच होता. इतरसरकारच्या काळात असे काही घडले असते, तर देवाभाऊ आणि त्यांच्या गणंगांनी आकाशपाताळ एक केले असते. पश्चिम बंगालमध्ये अशाच प्रकारची घटना घडली, तेव्हा देशभर डॉक्टरांनी एक दिवसाचा 'बंद 'पाळला होता. अनेक दिवस निदर्शने चालू होती आणि भाजपनेही पश्चिम बंगाल सरकार बरखास्त करण्याची मागणी केली होती. महिला अत्याचाराच्या प्रकरणात या प्रकारची राजकीय चर्चा करण्याची



माझीही इच्छा नसते. परंतु कधी ना कधी तरी या भाजपवाल्यांची, महायुतीवाल्यांची दुहेरी नीती आणि ढोंगीपणा दाखवून हा दिलाच पाहिजे. पश्चिम बंगालातील घटनेशी काहीसे साधर्म्य असलेली घटना महाराष्ट्रात घडली असताना, राज्य सरकार आणि माध्यमे यांनी मिळून मुख्यमंत्री किती 'कर्तव्यकठोर' आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे... शिवरायांचा वारसा सांगण्याचे नाटक करणाऱ्यांच्या राज्यात स्त्रिया सुरक्षित नाहीत. सातारमध्ये ही घटना घडूनही तिथले दोन 'राजे' चकार शब्द बोलायला तयार नाहीत. एक 'शंभू' तर ठाण्याच्या कंत्राटपुरुषाची फक्त तळी उचलण्याचेच काम करत असतात! असो. दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री आणि माध्यमांचा दिवाळीच्या निमित्ताने म्हणे सुखसंवाद झाला होता.. त्यामुळे. माध्यमे मुख्यमंत्र्यांच्या प्रेमात असणे स्वाभाविक आहे... एकूण, सर्व काही छान चाललंय. महाराष्ट्र आता थांबणार नाहि आस ंटि करप्शन ब्युरो ऑफ इंडिया जिल्हाप्रमुख बीड आजिनाथ खेडकर यांनी सांगितले.की आम्ही ंटि करप्शन ब्युरो ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष मा.राजशी जिंदाल उपाध्यक्ष मा.दिलिप नाना सोनवणे.प्रदेश अध्याक्षा मा उमाताई कांबळे प्रदेश अध्यक्ष मनिष सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली या पिडीत डॉ मुंडे यांना न्याय मिळे पर्यंत लढा चालु ठेऊ.त्या वेळी बबन दहिफळे.ड.प्रल्हाद ढाकणे.तालुका प्रमुख संदिप जायभाये.प्रशांत जगताप.आशोक जायभाये.भिमराव औसरमल.शाहादेव पवार.आक्षय फुलावळे.व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# दंडेलशाही ला घाबरू नका मी सदैव तुमच्या पाठीशी आहे खा : अशोकराव चव्हाण

अनिल धमने पाटील
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

नांदेड :- या पुर्वी मी अनेक निवडणुकी मध्ये किवळा या गावी आलेला आहे त्या साठी किवळा गाव माझ्यासाठी नवीन नाही कारण लोकसभेला विधानसभेला अनेक वेळा या ठिकाणी येण्याचा प्रसंग मला आला त्यामुळे किवळा वाशीयांचा जिव्हाळा माझ्यासोबत राहिलेला आहे किवळा गाव माझे गाव आहे असे समजून मी आपल्या गावासह परिसरातील गावाचा सर्वांगीण विकास करेण तुम्ही कुठल्याही दंडेलशाहीला बळी पडू नका मी सदैव तुमच्या पाठीशी राहील कारण महाराष्ट्र राज्यात व केंद्रात भाजपाची सत्ता असल्यामुळे येत्या निवडणुकीमध्ये तुम्ही सर्वांनी सोबत राहून खंबीर नेतृत्वाला साथ देऊन माझ्या सोबत असाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो की आपल्या देशाचे पंतप्रधान विकास पुरुष नरेंद्र मोदी हे असल्यामुळे तुमच्या विकासाला चालना देण्यासाठी तुम्ही सर्वांनी खंबीरपणे आमच्या सोबत आहेत आणि राहणार आहेत यात तीळ मात्र शंका वाटत नाही नेतृत्व खंबीर विकास प्रगतशील असेल त्यासाठी आगामी निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात भाजपा पक्षच एक नंबरचा पक्ष असेल त्यासाठी तुम्ही सर्वांनी आमच्या पाठीशी राहून विकासात्मक कामे करून घ्या आम्ही दिलेल्या उमेदवारांना साथ द्या आम्ही तुमच्या गावाचा सर्वांगीण विकास करू असे आश्वासन माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांनी दिला आहे .

आगामी निवडणुकी च्या अनुषंगाने किवळा येथे भाजपाच्या वतीने वडेपुरी सर्कल च्या वतीने कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन संजय पाटील घोगरे व राजू पाटील येवले यांनी कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता या मेळाव्या प्रसंगी अशोकराव चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले .

या कार्यक्रमा प्रसंगी भाजपा नेते देविदास राठोड .भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर .एकनाथ पवार .बालाजी पांडागळे .विजय धोंडगे . मनोहर पवार . चंद्रसेन पाटील .अरुणाबाई ज्ञानोबा टर्के .मीनाक्षीताई येवले .अशोक पाटील लोंढे . योगेश नंदनवनकर . माजी विरोधी पक्ष नेते जीवन पाटील घोगरे . माधव पाटील टर्के .माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे . शरद पवार .माजी नगरसेवक राजू पाटील काळे .राजू गोरे . उदय देशमुख . श्रीनिवास जाधव .संजय इंगेवाड . वैजनाथ देशमुख . सतीश बस्वदे . राजू लांडगे .यासह परिसरातील शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने



उपस्थित होते .

आगामी निवडणुकीत वडेपुरी सर्कल मध्ये सर्वांनी एकजुटीने काम करून भाजपाच्या उमेदवारांना विजयी करावे किवळा गाव हे सैनिकांचे गाव असल्यामुळे वडेपुरी सर्कल मध्ये बदल झालाच पाहिजे घराणेशाहीला हद्दपार करा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारांना विजयी करा असे आवाहन एकनाथ पवार यांनी केले .

भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर यांनी वडेपुरी सर्कल मधले सुजाण नागरिकांनी वडेपुरी सर्कलच्या विकासासाठी एकमताने निवडणूक लढवून आपल्याच उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे असावे विजय आपलाच होणार असल्याचे विश्वास त्यांनी व्यक्त केले

या कार्यक्रमा प्रसंगी किवळा गावात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व त्यांच्या सोबत आलेल्या सर्व पद अधिकारी यांचे जंगी ढोल ताश्यांच्या गजरात फटाक्यांच्या अतिषबाजी ने व जे सिबी च्या सह्याने पुष्पहार घालून व पुष्पवृष्टी करून जोरदार स्वागत करण्यात आले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले तसेच

शहीद ज्ञानोबा टर्के यांच्या स्मारकास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले या कार्यकर्ता मेळाव्याचे प्रस्ताविक संजय पाटील घोगरे यांनी केले तर सूत्रसंचालन शाहीर गौतम पवार यांनी केले संजय पाटील घोगरे व राजू पाटील येवले यांच्या वतीने आलेल्या प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाप्रसंगी किवळा ग्रामपंचायत सदस्य रतन पाटील सर्जे यांच्यासह वडेपुरी सर्कल मधील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपा पक्षात अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश करण्यात आला तर या कार्यक्रमात वडेपुरी सर्कल व कंधार लोहा नवीन नांदेड भागातील शेकडो कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली .

## डॉ.संपदा मुंडे यांना न्याय मिळण्यासाठी माजी आमदार डॉ.नारायणराव मुंढे उपोषणाला बसणार

बीड/प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केलेली आहे. आत्महत्या



केलेल्या महिला डॉक्टर ह्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी माझ्यावर अन्याय होत आहे मी आत्महत्या करेल अशी वरिष्ठांकडे तक्रार पण केली होती परंतु वरिष्ठांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पीडितेला न्याय मिळावा व सर्व आरोपींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी व संपूर्ण प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करून प्रकरणा तील दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हादाखल करावा या मागणीसाठी माजी आमदार डॉक्टर नारायणराव मुंढे हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिनांक २७-१०-२०२५ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसणार आहेत.

## जेष्ठ महिला नागरीक शोभाबाई प्रतापसिंह ठाकूर यांचे निधन..



नवीन नांदेड - हडको कंथक नगर येथील जेष्ठ महिला नागरीक शोभाबाई प्रताप सिंह ठाकूर यांचे वृद्धापकाळाने २३ ऑक्टोबर रोजी त्यांच्या निवासस्थानी निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते त्यांचा पश्चात संतोषसिंह प्रतापसिंह ठाकुर, कैलास प्रतापसिंह ठाकुर , रमेशसिंह प्रतापसिंह ठाकुर तिनं मुले व मालतीबाई लक्ष्मणसिंह कार्तिक, एक मुलगी,नातु पणतु,असा परिवार आहे. त्याचा पार्थिव देहावर राम घाट शनि मंदिर नांदेड येथे २४ ऑक्टोबर रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पालक मंत्र्यांच्या दौऱ्यानंतरही जालना जिल्ह्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित;महायुतीच्या सत्तेखाली शेतकऱ्यांची दीपावली अंधारात

### शेतकऱ्यांची दिपावली अंधारात आणि नेत्यांची स्हेन मेजवानी प्रकाशात हा विरोधाभास शासनाच्या संवेदनशुन्यतेचा कडवा पुरावा...

फारुक शेख

पालक मंत्र्यांचा गाजावाजा झालेला दौरा अधिकाऱ्यांच्या बैठका आणि घोषणांचा पाऊस झाल्यानंतरही जालना जिल्हा आजही शासनाच्या अनुदानापासून वंचित आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान सोसले परंतु त्यांच्या मदतीसाठी शासनाकडून एकही ठोस निर्णय किंवा मदतीचा हात पुढे आलेला नाही.

एकीकडे शासन शेतकऱ्यांची दीपावली गोड करू असे आश्वासन देत होते तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या घरात अंधार आणि ओढग्रस्त परिस्थिती आहे. शेतीचे खर्च वाढले उत्पादनाचे दर कोसळले आणि आता पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी पूर्णपणे कोलमडले आहेत.पण तरीही महायुती सरकारच्या मंत्र्यांचे लक्ष फक्त स्वागत,सत्कार आणि आमदारांच्या स्नेह मिलन कार्यक्रमांवरच केंद्रित दिसते.

अतिवृष्टीमुळे हजारो एकरवरील पिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.अनेक शेतकरी शेतीमाल गहाण ठेवून दिवाळीचा खर्च भागवत आहेत तर काही जण बँकांच्या वसुलीच्या नोटीसांनी हैराण झाले आहेत. तरीही जिल्हा प्रशासन व राज्य शासन मात्र मौन बाळगून आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की पालक मंत्री आले दौरे झाले पण आमच्या हातात



आले काय ? केवळ घोषणा आणि फोटोंची चमक

यावर शेतकऱ्यांची नाराजगी आणि काही सामाजिक संघटनांनी सरकारवर तीव्र निशाणा साधला आहे. त्यांचे म्हणणे आहे की महायुतीची सत्ता असलेला जालना जिल्हा आज शासनाच्या दुर्लक्षाचा बळी ठरत आहे.पालक मंत्री व सत्ताधारी आमदारांनी जर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व केले असते तर आज जिल्हा अनुदानासाठी झगडत नसता.

शासनाने तात्काळ जालना जिल्ह्यासाठी विशेष अनुदान पॅकेज जाहीर करावे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना थेट खात्यात मदत द्यावी आणि पंचनाम्यांची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अशी मागणी आता तीव्रतेने होत आहे. अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलनाचा मार्ग अवलंबतील असा इशारा कृषी संघटनांकडून देण्यात आला आहे.

## काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी संधी दिल्यास संधीचे सोने करु :- ॲड. विद्याताई गायकवाड (पवार)

### पक्षाने आदेश दिला तर ताकतीने बीड न.प. चे नगराध्यक्ष लढणार - ॲड. विद्या गायकवाड ( पवार)

प्रतिनिधी । बीड

स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या होऊ घातलेल्या निवडणुकीत बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण नुकतेच जाहीर झाले असून हे आरक्षण अनुसूचित जाती महिला या आरक्षण सूचीमध्ये सुटले असून बीड न्यायालयात वकिली करणाऱ्या आणि मागच्या दहा वर्षापासून काँग्रेस पक्षात सक्रिय काम करत असून अनुसूचित जाती या विभागाच्या काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष म्हणून देखील यांनी काम पाहिलेले तसेच काँग्रेस पक्षाच्या पंचायतराज विभागाच्या प्रदेश महासचिव ड. विद्या गायकवाड ( पवार) या पदावर आजतगायत काम करत आहेत. त्या सध्या बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार असून जर पक्षाने आदेश दिला तर ताकतीने बीड नगर परिषदेचे नगराध्यक्षपदी निवडणूक लढवण्याची तयारी मागील बऱ्याच दिवसापासून ड. विद्या गायकवाड ( पवार) या करत आहेत.

होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या निवडणुकीत मागील आठ वर्षापासून सर्व नगरपालिका वर प्रशासक असून एकाही नगरपरिषदेमध्ये निवडणुका झाल्या नाहीत तसेच नवीन पद्धतीने झालेल्या विभाग रचनेमुळे महाराष्ट्रातील तसेच बीड जिल्ह्यातील प्रत्येक नगरपरिषद नगरपालिका क्षेत्रामधील एकाही वार्डामध्ये प्रत्यक्ष उमेदवार म्हणून एकही परिपूर्ण महिला उमेदवार रिंगणात नाही. तसेच बीड नगरपरिषद क्षेत्रामध्ये नगराध्यक्ष पदाकरिता



एकाही पक्षाकडे सक्षम महिला उमेदवार तथा उच्चशिक्षित उच्च विद्या अभूषित अशी महिला उमेदवार नाही. या निवडणुकीमध्ये मागच्या सहा महिन्यापासून ड. विद्या गायकवाड ( पवार) आम्ही घरोघरी जाऊन महिलांशी संपर्क करून निवडणुकीबद्दल वार्ता वार्डात संपर्क केलेला आहे. या संपर्क अभियानात त्यांनी प्रत्येक वार्डाच्या असंख्य कुटुंबांचे सरकारी दवाखाना, तहसील कार्यालय, नगरपरिषदेमधील कामकाज हे मोफत करून दिलेले आहे त्यामुळे त्यांचा असंख्य कुटुंबामध्ये दांडगा जलसंपर्क आहे. जर पक्षाने या सर्व बाबीचा विचार केला तर उच्चशिक्षित तसेच सामाजिक विषयाची चांगली जाण असणारी उमेदवार म्हणून त्या नक्कीच बीड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष होतील त्यामुळे पक्ष त्यांना नक्कीच संधी देईल. त्यांच्या उमेदवारीची चर्चा प्रत्येक वार्डात व मोठ्या राजकारणात चालू आहे

## धारूर तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये दिवसाढवळ्या चोरी

शेतकऱ्याचे पन्नास हजार रुपये लहान मुलाने लंपास केले

प्रतिनिधी । धारूर

धारूर तालुक्यातील अरणवाडी गावा येथील शेतकरी सुमंत फुटाणे हे अनुदानाची रक्कम उचलण्यासाठी धारूर येथील एसबीआय (हैदराबाद शाखा) बँकेत आले असता, दिवसाढवळ्या चोरीची धक्कादायक घटना घडली. धारूर तालुक्यातील अरणवाडी येथील शेतकरी सुमंत फुटाणे यांनी २४ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी बँकेतून रक्कम काढून काउंटरवर चौकशी सुरू असतानाच, एका लहान मुलाने नकळतपणे त्यांच्या जवळील पन्नास हजार रुपयांचे बंडल उचलले व त्वरित पळ काढला. या मुलासोबत आणखी एक साथीदार मुलगाही उपस्थित असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसून आले आहे.



परंतु

किल्ले धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे साहेब हे तपास पुढील करत आहे

## महिला डॉक्टर बीडची मुंडे असल्याने वरिष्ठांनी तक्रार डावलली असेल तर गंभीर




प्रतिनिधी । मुंबई

मुंबई : साताऱ्यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर आता आरोग्य आणि पोलीस व्यवस्थेविरोधात अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. वरिष्ठांच्या दबावामुळे आणि पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या बलात्कारामुळे फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरने आत्महत्या केली. या प्रकरणी तिने पोलीस उप-अधीक्षकांकडेही तक्रार नोंदवल्याची माहिती समोर आली आहे. त्यावरूनच आता राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी एसआयटी चौकशीची मागणी केली आहे.

सदरची महिला डॉक्टर ही बीडची असल्याने आणि मुंडे असल्याने जर वरिष्ठांनी तिच्या तक्रारीची दखल घेतली नसेल तर ते गंभीर आहे. या प्रकरणी स्वतंत्र एसआयटी नेमण्यात यावी. तसेच हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली.

सातारा जिल्ह्यातील फलटण येथे रुग्णसेवेत असलेल्या व मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टर यांच्याबाबत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. माझ्या त्या डॉक्टर भगिनीला भावपूर्ण श्रद्धांजली. तिच्या अकाली निधनाने कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात मी सहभागी आहे.

या घटनेतील दोषींना कठोर शासन व्हावे, तसेच ती मुंडे आहे व बीडची आहे म्हणून तिने केलेल्या तक्रारी वरिष्ठांनी डावलल्या असतील तर हे अतिशय गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र एस आय टी नेमून चौकशी करण्यात यावी तसेच हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवले जावे व दोषींना कडक शासन व्हावे, याबाबत उद्या राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना पत्र देणार आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रूग्णालयात एका महिला डॉक्टरने आत्महत्या केली. मृत डॉक्टरच्या हातावर सुसाईड नोट आढळली आहे. या सुसाईड नोटमध्ये महिला डॉक्टरने आपल्यावर बलात्कार झाल्याचं लिहिलंय. त्यात तिने पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदनेचं नाव लिहिलंय. पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदनेनं चारवेळा बलात्कार केल्याचं सुसाईड नोटमध्ये लिहिलंय. तसंच प्रशांत बनकर नावाच्या व्यक्तीनेही मानसिक त्रास दिल्याचं सुसाईड नोटमध्ये म्हटलंय.

आरोग्य विभागातील वरिष्ठ आणि पोलिसांनी पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी आपल्यावर दबाव आणल्याचं पीडितीने आपल्या सुसाईट नोटमध्येस म्हटलं आहे. तसेच या प्रकरणी पोलीस उपाधिक्षांकडे तक्रार करुनही त्यांनी दखल घेतली नसल्याचं म्हटलं आहे.

# येडेश्वरी परिवाराच्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाला अलोट गर्दी

## येडेश्वरी कारखान्यावर जिल्हाभरातील नागरिक आले एकत्र

केज/प्रतिनिधी

येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१आनंदगाव सा. ता.केज येथे येडेश्वरी परिवाराच्या वतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्नेहमिलन व फराळाचा सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी सर्वांचे स्वागत करून जिल्हा भरातून एकत्र आलेल्या नागरिकांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

खा.बजरंग सोनवणेयांच्या वतीने येडेश्वरी साखर कारखाना,आनंदगाव येथे दिवाळीच्या पार्श्वभुमीवर स्नेहमिलन व फराळाचा कार्यक्रम आयोजीत केला होता.या आनंदसोहळ्यात बीड जिल्ह्यातील मान्यवर



पदाधिकारी,कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.आपुलकी,आनंद, एकताआणि सहभावनेचा हा सोहळा येडेश्वरी परिवाराच्या स्नेहबंधनाला आणखी बळकट करणारा ठरला.कार्यक्रमा दरम्यान परस्पर संवाद,शुभेच्छा विनिमय आणि सहकाऱ्यांच्या मैत्रीपूर्ण गप्पांमुळे वातावरण स्नेह पूर्ण आणि उत्साही बनले. या प्रसंगी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या सर्वांचे आभार खा.सोनवणे यांनी मानले.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित ऊस उत्पादकांशी संवाद साधत नवीन पध्दतीने शेती करण्यासाठी सज्ज व्हा,एआय तंत्रज्ञात विकसीत होत आहे. यानूसार आता शेती करावी लागेल.तेव्हा, आपल्याला शेतीतून अधिक उत्पन्न घेणे शक्य होईल.नव्या बदलासाठी सर्वांनी पुढे येणेआवश्यक आहे.उत्पादन वाढविण्या साठी लागेल ती करायची तयारी ठेवा,कष्ट,मेहनती सोबत योग्य नियोजन देखील आवश्यक आहे. यासाठी कारखान्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन देखील करण्यात येईल, असेही यावेळी खा.सोनवणे म्हणाले. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

# अंबड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने अतिक्रमणधारकांची दादागिरी

## नागरिकांत संतापाचा उद्रेक प्रशासन गप्प पण शहर गिळलं जातंय

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील अतिक्रमणधारकांचा वाढता माज आणि त्यामागे नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचा थेट आशीर्वाद असल्याचे चित्र दिसत आहे शहरातील जुनी तहसील रोडवरील भाजी मंडई परिसर, तसेच जालना-अंबड रोडवरील सर्वे नंबर ३९ मधील ले-आऊटमधील खुल्या जागेवर (ओपन स्पेस) बिनदिक्कतपणे अतिक्रमण झाले असून, प्रशासन मात्र आंधळे आणि बहिरे बनलेले दिसते.सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेली जमीन काही प्रभावशाली मंडळींनी बेकायदेशीररीत्या गिळंकृत केली आणि नगरपरिषद प्रशासनाने जणू मौनव्रतच घेतले आहे. नागरिकांच्या असंख्य तक्रारी, लेखी निवेदने,अगदी उपोषणानंतरही कारवाईच्या नावाखाली फक्त थातुरमातुर पत्रव्यवहाराचा दिखावा सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी कारवाईऐवजी पंचनामा करु फाइल तपासात आहे अशा फसव्या आश्वासनांनी तक्रारदारांना गुंतवून ठेवले आहे. पण प्रत्यक्षात एकाही अतिक्रमणावर ठोस कारवाई झालेली नाही.उलट अतिक्रमणधारकांना संरक्षण आणि पाठींबा दिला जात असल्याचे शहरातील जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.शहरात आता खुलेआम चर्चा सुरू आहे की मुख्याधिकारी आणि अतिक्रमणधारक यांच्यात आर्थिक देवाणघेवाण सुरू असून त्यामुळंच प्रशासन गप्प बसले आहे. नगरपरिषदेतील काही कर्मचारीही या गैरकारभारात सामील असल्याचे नागरिकांचे स्पष्ट म्हणणे आहे.

दरम्यान जुनी तहसील रोडवरील भाजी मंडई परिसरात काही गुंड प्रवृत्तीचे अतिक्रमणधारक रस्त्यांवर कब्जा करून सामान्य नागरिकांना दमदाटी आणि त्रास देत आहेत.तक्रारींनंतरही कोणतीच कारवाई न झाल्याने नागरिकांत अवविश्वास आणि संतापाचा उद्रेक होत आहे.

शहर गिळणाऱ्या अतिक्रमणधारकांच्या मागे कोणाचे आशीर्वाद आहेत ? आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कोणासाठी काम करतात ? लोकांच्या भावना आता उफाळून आल्या असून नागरिकांकडून मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय रस्ते ओपन स्पेस नगर परिषद चे मालकी जागा मुख्याधिकारी नगरपरिषद अंबड यांनी विकल्या काय कारवाईचे लेखी पत्र देऊन सुद्धा ही कारवाई करत नाही याचे कारण काय अशी कुजबूज शहरात ऐकायला मिळत असून याला पाठबळ कोणाचे ? अंबड शहरातील प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे आणि संगनमतामुळे शहराचे भवितव्य अंधारात ढकलले जात आहे.

# बाभुळगाव फाटा येथे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे जल्लोषात स्वागत...

नवीन नांदेड - महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे नांदेड तालुक्यातील बाभुळगाव चौरस्ता येथे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे व सरपंच पुंडलिक मस्के यांच्या वतीने ढोलताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये स्वागत करून अशोकराव चव्हाण अगो बढो च्या घोषणा देण्यात आल्या.

आगामी जिल्हा परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने लोहा तालुक्यातील डेरला,लोहा शहर,व किवळा यासह जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा मेळावा मार्गदर्शन, निमित्ताने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमर राजूरकर, एकनाथ पवार,चंद्रसेन पाटील, देविदास राठोड, शरद पवार,आगमन झाले यावेळी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव चौरस्ता येथे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, सरपंच पुंडलिक मस्के यांनी फटाक्यांची आतिषबाजी व ढोलताशांच्या गजरात भव्य दिव्य स्वागत करून सत्कार करण्यात आला.अशोकराव चव्हाण अगो बढो हाम तुम्हारे साथ है या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी भगवान बोडके,दिपक मस्के, मनोहर मोरे, भगवान मस्के, बाबुराव मस्के,दता बोडके, धोंडीबा बोडके,काळबा बोडके,माधव बोडके, गजानन बोडके, सचिन मस्के, अवधुत मस्के,बबलु मस्के,शिवाजी मस्के,आनंदा पांचाळ,आनंदा मस्के,साई बोडके, अवधुत मस्के, बाबाराव मस्के, बालाजी मोरे,दता मोरे यांच्या सह युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्रशालेत 'स्नेहमीलन सोहळा' उत्साहात संपन्न

प्रतिनिधी : जाफराबाद हरी भालके

जाफराबाद दि.२४ जि.प. प्रशाला साल २००१-०२ च्या शैक्षणिक वर्षाच्या इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांचा स्नेहमीलन सोहळा उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी सर्व माजी-आजी शिक्षकांची तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच व्हाट्सअपद्वारे एकमेकांशी कनेक्ट असले तरी खरा मैत्रीचा आनंद हा गळाभेट घेऊनच मिळतो.याचीच प्रचिती घेण्यासाठी या गेट टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या या माजी विद्यार्थ्यांच्या भेटगाठी कार्यक्रमात तब्बल अडीच दशकानंतर जि. प. प्रशालेच्या प्रांगणात पुन्हा सर्व वर्गमित्र अणि शिक्षक एकत्र आले .

कार्यक्रमाची सुरुवातीला स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्री बाई फुले,तसेच देशासाठी शहीद झालेले वर्गमित्र कै.किशोर पारवे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. या सोहळयाचे अध्यक्षस्थानी विद्यमान मुख्याध्यापक उमेश दुनगहू होते तर प्रमुख पाहुणे म्हूणून तत्कालीन मुख्याध्यापक एल. बी. शिंदे, गटशिक्षणाधिकारी सतिश शिंदे,संजय भुजंग,बी बी पवार, वासनिक,डी. डी. शिंदे, इंगळे, साळवे हे शिक्षक उपस्थित होते.

या प्रसंगी सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला सर्व विध्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत




न्यायाधिश मयुर गौतम,प्रदीप वाकडे, गजानन तायडे,एजास शहा,भगवान चव्हाण,पार्वती चव्हाण अनिल उगले यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच यावेळी देशासाठी शहीद झालेले किशोर पारवे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांना फुल ना फुलाची पाकळी ' गुरुदक्षिणा ' देऊन आशीर्वाद घेतले.त्यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. या सोहळ्यात माजी वर्गमित्रांची रंगतदार मैफिल रंगली. यात विनोद, कविता, चारोळ्या, संगित खुर्ची हास्यकल्लोळ ,शाळेतल्या खोड्या या सर्वांना उजाळा मिळाला. जुन्या आठवणींना उजाळा देत असतांना अनेक जण भावुक झाले होते.तर काहींना गहींवरुन आले कार्यक्रम यशस्वीतेसाठी रविराज जैस्वाल, संदीप सोळंके स्वाती डोईफोडे,माधवराव जाधव,दिपक हिवाळे,भरत भालके,आसिफ शेख बाबा,माधव सवडे,रविंद्र सपकाळ, शेख फिरोज,माधव चव्हाण,प्रविण धंदर,विशाल हिवाळे,दिपक हिवाळे, जावेद पठाण,मोहम्मद अल्ताफ,आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संदीप सोळंके, प्रस्ताविक शिवाजी पवार यांनी तर,आभार अश्विनी मयुर यांनी मानले

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा म्हणजे विद्यालयाचा चालता बोलता जीवनपटच असतो -मा. आ. केशवराव आंधळे

प्रतिनिधी । वडवणी

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २००५ च्या १० वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीचा गेट-टुगेदर स्नेह मिलन मेळावा मा. आ. केशवराव आंधळे संस्कार शिक्षण मंडळाचे कार्यवाह यांच्या अध्यक्षतेखाली आणि अंजली आंधळे यांच्या कर्तव्यदक्ष नियोजनाने शतप्रतिशत संपन्न झाला .





याचा सविस्तर वृत्तांत असा की, २००५ मध्ये शिक्षण घेत असलेल्या महाराणी ताराबाई विद्यालयाच्या विद्यार्थिनींचा स्नेह मिलन मेळावा मा. आ. केशवराव आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली तर पंचायत समितीच्या माजी सभापती श्रीमती सुलोचनाताई केशवराव आंधळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रोहिणी शिनगारे या विद्यार्थिनीने केले.तसेच रोहिणी शिंगारे ,अंजली मस्के, आम्रपाली मस्के, अश्विनी वखरे, या विद्यार्थिनींनी स्वागत पर गीत सादर केले . यावेळी विद्यार्थिनींनी शाळेच्या अनेक गमंती जमंती खेळाडू वृत्तीने व्यक्त केल्या .शाळेचे योगदान आमच्या जीवनात अनमोल असे आहे या शाळेने जे जे शिस्तीचे धडे ,गणिताचे पाढे आणि संस्काराचे बाळकडू दिले ते आजही आठवतात अशा प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या यामध्ये आम्रपाली मस्के ,स्वाती काळे ,रोहिणी वावदाने ,सीमा जाधव ,डॉ.रोहिणी अंकुशे ,उद्योजक आशा आळणे, सरिता माळवदे ,व प्रा.आगे स्वस्तीश्री यांनी शाळेबद्दलच्या भावना व्यक्त केल्या . यावेळी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य राऊत डी डी, धस यु एम ,श्री डोईफोडे आर.एस., उपप्राचार्य अशोक मस्के, श्रीमती जवंजाळ मॅडम ,श्रीमती फलके मॅडम व विद्यमान प्राचार्य श्रीमती शोभाताई आंधळे या उपस्थित होत्या त्यांनीही आपले विचार व्यक्त केले. श्री घोळवे डी.के ,श्री चोले बी पी हे शिक्षकही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. आ. केशवराव आंधळे यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बोलताना त्यांच्याही शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला ते बोलताना म्हणाले मी शिक्षण घेत असताना होत असलेली मुलींच्या शिक्षणाची दुरावस्था सहन न झाल्यामुळेच मी वडवणी सारख्या ग्रामीण भागात मुलीसाठीच शाळा सुरू केली म्हणून आज एवढ्या प्रचंड संख्येने विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत आहेत शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत हे पाहून मनस्वी आनंद होत आहे .

ते म्हणाले माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली मनोगत ही अतिशय बोलके असतात वास्तविक पाहता हा शाळेच्या प्रगतीच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने चालता बोलता जीवन पटत असतो अशा प्रकारचे भावगर्भ विचार व्यक्त केले .सकाळच्या सत्रामध्ये सूत्रसंचलन अश्विनी वखरे व अंजली मुंडे यांनी केले. तर दुसऱ्या सत्रामध्ये स्वाती काळे, सरिता माळवदे यांनी सूत्रसंचालन केले दुपारच्या सत्रात संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात या विविध खेळ खेळण्यात सर्व विद्यार्थीनी रममान झाल्या. या सर्व कार्यक्रमाचे आभार अंजली केशवराव आंधळे या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक यांनी मानले .स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता संपन्न झाली.

# नगराध्यक्ष पदासाठी संगीता वाघमारे यांच्या नावाची जोरदार चर्चा

बीड (प्रतिनिधी) आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जातीच्या महिलांसाठी सुटल्याने, बीड शहरात आता विविध नावांची चर्चा रंगू लागली आहे. त्यात सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे सौ. संगीता वाघमारे यांचे आहे. संगीता वाघमारे या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून, सामान्य जनतेच्या अडचणी सोडविणे, गरजू नागरिकांना मदत करणे, तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे यामुळे त्या लोकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. दररोज त्या जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या समस्या जाणून घेतात आणि शक्य त्या सर्व मार्गांनी त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या लोकाभिमुख कार्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदरभाव आणि विश्वास वाढत आहे. आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर नागरिकांमध्ये संगीता वाघमारे या नगराध्यक्ष पदाच्या प्रबळ दावेदार ठरू शकतात अशी चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. शहरातील अनेक नागरिक, महिला गट आणि युवक त्यांना पाठिंबा देत असून सामान्य माणसाची नगराध्यक्षा म्हणून त्यांचे नाव घेतले जात आहे. स्थानिक पातळीवर विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि नागरिकांचा त्यांना



वाढता पाठिंबा पाहता, आगामी निवडणुकीत संगीता वाघमारे या नगराध्यक्ष पदासाठी प्रमुख दावेदार ठरतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# अल्पसंख्यांक प्रमाणपत्राचा वाटपाचा कार्यक्रम आयोजित



प्रतिनिधी । भद्रावती

महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय मुंबई तथा अल्पसंख्याक विकास विभाग चंद्रपूर वतीने , महाराष्ट्र शासन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहु, फुले, आंबेडकर पुरस्कार प्राप्त साईबाबा बहुउद्देशीय संस्था पिटीगुडा नं१ ता जिवती जि चंद्रपूर व्दारा संचालीत श्री दिगांबर नाईक निवासी पोलिस भरती पुर्व प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे दिनांक १८/१०/२५ रोजी १२:०० वाजे स्थळ डी एन जे अभ्यासिका तुकुम चंद्रपूर येथे करण्यात आले आहे

प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे कार्यक्रमाचे उद्घाटक आदरणीय मा श्री किसनराव जी नवघरे राखीव पोलीस निरीक्षक साहेब प्रमुख अतिथी म्हणून आदरणीय मा श्री आनंद जी आंगलवार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय विमुक्त जाती घुमतू वेल्फेअर असोसिएशन दिल्ली पाहुणे म्हणून मा श्री शरद शेवाळे साहेब पी एस आय प्रमुख पाहणे मा श्री माधव रेड्डी, निखिल धोडरे,महोदय तसेच सर्व शिक्षक वृंद प्रशिक्षणार्थी बांधव उपस्थित होते सर्व प्रशिक्षणार्थींना किट वाटप, साहित्य वाटप करण्यात आले सूत्रसंचालन मा श्री प्रवीण जी सलामे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा श्री गोविंद जी पवार कोच यांनी केले आहे वंदे मातरम् जय हिंद




माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव शहरातील एका रुग्णालयात उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू झाल्याचा प्रकार सोमवारी राधाकृष्ण डाके यांच्या हॉस्पिटलमध्ये घडला. दरम्यान, त्यानंतर काहीवेळात डॉक्टरांनी केलेल्या चुकीच्या उपचारामुळेच या ५५. वर्षीय रुग्णाचा मृत्यू झाल्याचा आरोप करत नातेवाईकांनी दवाखान्यात धुडगुस घातल्याची माहिती येथील डॉक्टरांनी दिली.

छत्रपती संभाजी महाराज चौकातील असलेल्या माऊली हार्ट केअर या हॉस्पिटलमध्ये काही दिवसापूर्वी राजेवाडी येथील बाळासाहेब बाबासाहेब बोबले या रुग्णाला छातीत दुखत असल्यामुळे सोमवारी सकाळी रुग्णालयात आणले होते. उपचारादरम्यान डॉ. राधाकृष्ण डाके चुकीचे उपचार व हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू झाला असल्याचा आरोप नातेवाईकांनी नातेवाईकांचे असेही म्हणणे आहे की डॉक्टरने बोंबले यांना ८० हजार रुपये जमा करू स्तर कसल्याही प्रकारचा पेशंटचा उपचार केला नाही नंतर ८० हजार रुपये जमा केल्यावर पेशंटचे उपचार चालू केले व पेशंटच्या जवळ कोणालाही जाऊ दिले नाही असाही आरोप नातेवाईकांचा आहे. डॉक्टरांच्या चुकीमुळे बाळासाहेब बोबले याचा मृत्यू झाला असल्यामुळे त्यांच्या

नातेवाईकांनी शहर पोलिसात डॉ. राधाकृष्ण डाके यांचे विरोधात तक्रार दिली होती. दरम्यान रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णालयात धुडगुस घालून डॉक्टरांना शिवीगाळ केल्याची घटना घडली.

# खा.अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते रतन सर्जे यांचा भाजपात प्रवेश..

**नांदेड – माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांच्या नेतृत्वाखाली लोहा तालुक्यातील किवळा येथे ग्रामपंचायत सदस्य तथा सेवा सोसायटी उपाध्यक्ष रतन सर्जे यांच्या सह अनेक गावांतील युवक व पदाधिकारी यांनी भाजपा पक्षात पक्ष प्रवेश केला यावेळी खा.अशोकराव चव्हाण यांनी भाजपा पक्षाची कमळ निशाणी असलेली दस्ती टाकुन पक्ष प्रवेश करूण घेतला.**



दि २४ ऑक्टोंबर रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर,एकनाथ पवार,देविदास राठोड,एकनाथ पवार,संजय पाटील घोगरे,राजु पाटील येवले यांच्या उपस्थितीत वडेपूरी सर्कल मधील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा किवळा येथे दि २४ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता,यावेळी सेवा सोसायटी उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य रतन सर्ज यांच्या सह चेअरमन बालाजी दिनाजी ढगे, सदस्य शिवाजी हंबीलकर ,दता देशमुख,रावसाहेब देशमुख,व्यंकटी चिते,गणपत सर्जे,शंकर अंबुरे,हारि मोरे, रामाजी बारोळे,धोंडीबा बारोळे, यांच्या सह जोशी सांगवी ऊपसरपंच विक्रम मोरे,वडगाव विनायक काळे,वडगाव तांडा सुधाकर राठोड, आनंदा जाधव,बोरगाव व्यंकटी आढाव यांच्या सह वडेपूरी सर्कल मधील टेळकी,डेरला सह अनेक गावांतील युवकांनी भाजपा पक्षात प्रवेश केला आहे.या पक्ष प्रवेशा मुळे वडेपूरी सर्कल मध्ये भाजपा पक्षाची ताकद वाढली आहे.

# अनुलोम माध्यम व संघ प्रेरणेचा हृदयस्पर्शी उपक्रम

## सेवा करणाऱ्याची सेवेची दिवाळी!

नायगाव : प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे प्रकाश, आनंद आणि माणुसकीचा सण. याच माणुसकीचा दीप प्रज्वलित करत अनुलोम माध्यम आणि संघ प्रेरणा यांनी यंदा एक वेगळी, अर्थपूर्ण दिवाळी साजरी केली. नरसी येथील दोन महिला, ज्या कचरा वेचून आपली उपजीविका करतात, त्या दिवाळीच्या दिवशी रस्त्यावरून जात असताना, अनुलोम माध्यमच्या प्रतिनिधींनी त्यांना सन्मानपूर्वक घरी बोलावले. त्यांना स्वच्छ हातपाय धुवायला लावून घरातील सोफ्यावर बसवण्यात आले आणि घरगुती फराळ देऊन आत्मीयतेने सण साजरा करण्यात आला.

या दोन महिला सासू-सून असून, सुनेला चार मुली व एक मुलगा आहे. त्यांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे टाकाऊ वस्तू गोळा करणे. फराळ झाल्यानंतर त्यांना



आहेर देऊन त्यांच्या लेकरांसाठीही फराळाचा वाटा देण्यात आला. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहूनच खरी दिवाळी साजरी झाल्याचा आनंद अनुलोम माध्यमच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, आपल्या समाजात असे अनेक परिश्रमी लोक आहेत, ज्यांच्या हातांनी आपल्या परिसराची स्वच्छता टिकते. त्यांच्याही घरी प्रकाशाची एक दिवा जावा, यासाठी हा छोटासा प्रयत्न. सेवेची संधी मिळाली... हीच खरी दिवाळीची भेट! अनुलोम माध्यमतर्फे कचरा वेचणाऱ्या मातांसोबत साजरी दिवाळीचा क्षण.

# केज येथील भगवान श्रीकृष्णआश्रम येथे आनंदी दीपावली महोत्सवात दिव्यांग बांधवांना

## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

प्रेरणादायी प्रबोधन व आध्यात्मिक प्रवचनाने उत्साहात साजरा झाला दीपावली उत्सव

केज/प्रतिनिधी

केज शहरात सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांचा संगम घडविणारा आनंदी दीपावली महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा कार्यक्रम भगवान श्रीकृष्ण आश्रम,केज यांच्या वतीने भागवत भूषण ह.भ.प.श्री.केशव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून शुक्रवार,दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.याउपक्रमाचा उद्देश दिव्यांग बांधवांना दीपावली सणानिमित्त आनंदाचा वाटा देणे हा होता.कार्यक्रमाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्तीं ना जीवनावश्यक वस्तूंचे संच तसेच फराळाचे वाटप करण्यात आले. समाजातील वंचित घटकां प्रती आपुलकीचा हा भावनिक व सेवाभावी उपक्रम ठरला.यावेळी भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांचे प्रवचन झाले.




आध्यात्मिक प्रवचनाने प्रसन्न वातावरण

यानंतर महान तपस्वी, परम त्यागी स्वामी भारतानंद गिरी महाराज यांनी केलेल्या प्रवचनाने सभागृहात आध्यात्मिक प्रसन्नतेचे वातावरण निर्माण झाले.त्यांच्या ओजस्वी वाणीने उपस्थित भक्त मंत्रमुग्ध झाले. यावेळी आशिर्वाद देताना त्यांनी सांगितले की,गोर गरीब जनता व दिव्यांग यांना आपल्या घासातला घास दिला पाहिजे.मनो रुग्णांना देखील स्वच्छ करुन गोडधोड पदार्थ खायला द्यावेत.श्रीकृष्ण महाराज सारुक हे गेल्या तेरा वर्षांपासून हा उपक्रम घेत असुन मी दरवर्षी येत आहे.

सेवाभावी उपक्रमाने उजळली दीपावली

दुपारी २ वाजता अपंग व्यक्तींना जीवनावश्यक साहित्य संचाचे वाटप करण्यात आले.त्यानंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेह भोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले.समाजा तील विविध स्तरांतील मान्यवर,नागरिक,भाविक तसेच लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सेवाभावी उपक्रमाला यशस्वी केले.

हा उपक्रम केवळ दीपावली सणापुरता मर्यादित न राहता समाजसेवेचे प्रेरणादायी उदाहरण ठरला असून, आयोजकांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुगावेंच्या निमंत्रणावरून घुंगराळा येथे आ. सतीश चव्हाण यांची भेट

नायगाव :- संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांचे चहा-पान चे निमंत्रण स्वीकारत घुंगराळा येथे भेट दिली..आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार सतीश चव्हाण यांची भेट सुगावेंना होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी बळ देणारी ठरू शकेल का ?.

या वेळी सुगावे यांनी आगामी पदवीधर निवडणुकीसाठी चव्हाण यांना शुभेच्छा दिल्या. तसेच या वेळी त्यांनी पदवीधर मतदार नोंदणी बाबत आढावा घेतला तसेच त्यांनी पदवीधर मतदारांशी संवाद देखील साधला..

तसेच स्थानिक स्वराज्य



संस्थांच्या होणाऱ्या निवडणुकींबाबत दोघांत चर्चा झाली, या वेळी आमदार महोदयांनी सुगावे यांच्या बरबडा जिल्हा परिषद गटातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला, तसेच घुंगराळा ग्रामपंचायत च्या विकासकामांचे व ग्रामपंचायत च्या इमारत व स्वच्छतेबाबत कौतुक केले,

या वेळी आ. सतीश चव्हाण, डि. बी. जांभनूरकर, गोविंद मेथे , यशवंत कांबळे यांचा वसंत सुगावे पाटील मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला..

या वेळी गंगाधरराव बोधनकर, मा. विस्तार अधिकारी बालाजीराव मातावाड साहेब, तंटामुक्ती अध्यक्ष श्यामराव पा. ढगे, चेअरमन श्यामराव यमलवाड, मा. ग्रा. पं. सदस्य बालाजीराव हाळदेवाड, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष माधवराव पा. ढगे, मारोतराव दंडेवाड, मारोती पा. शिंदे, रघुनाथ पा. सुगावे, अशोक पा. शेळके, मुरहरी तुरटवाड, राम पा. सुगावे, बंटी बोधनकर, राजेश आलगटलेवार, शिवाजी पांचाळ, रोहिदास पा. ढगे, गणेश सुंकेवार, विलास पा. सुगावे, प्रदीप पा. सुगावे, बबन पा. ढगे, उमेश पा. कदम, आदी उपस्थित होते..फ

# बीडच्या डॉक्टर लेकीसाठी आ. सुरेश धस मैदानात !

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्राला हादरवरून सोडणारी घटना सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात घडली. या तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका २८ वर्षीय महिला डॉक्टने आत्महत्या करत आपले जीवन संपवले. आपल्यावर चार वेळा अत्याचार झाला असून, आपल्याला मानसिक त्रास झाल्याचे महिलेने तिच्या तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे. आता या घटनेत अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत.

महिलेने आत्महत्यापूर्वी तिच्या तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये दोन नावांचा उल्लेख केला होता. यापैकी एक आरोपी प्रशांत बनकरला पोलिसांनी आज पुण्यातून पहाटे चारच्या सुमारास ताब्यात घेतले आहे. तर दुसऱ्या पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. ही महिला डॉक्टर मूळची बीड जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणात अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर आल्या असून आता आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणाची त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. पोटाला चिमटा घेऊन ऊस तोडून आमचे लोक लेकीबाळीला शिकवतात. त्याचा जर असे लोक गैरफायदा घेणार असतील तर जरब बसली पाहिजे इथून पुढे असे प्रकरण होता कामा नये, असेही त्यांनी म्हटले. हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालले पाहिजे, अशी मागणी करत यासाठी एसआयटी स्थापन झाली पाहिजे, असे सुरेश धस यांनी सांगितले. महिलेची तक्रार न घेणारे उपजिल्हा रुग्णालयातील जे कोणी अधिकारी जबाबदार असतील ते सगळे यामध्ये आरोपी झाले पाहिजेत, अशीही मागणी सुरेश धस यांनी केली आहे. महिला मृत्यू प्रकरणात खासदार अन् पीए अशी माहितीही समोर येत आहे. यावर भाष्य करताना सुरेश धस म्हणाले, कोण खासदार असतील किंवा त्यांचे पीए दबाव टाकणारे असतील, हे तपासात पुढे येईल, जर तसे आढळून आल्यास त्यावर कारवाई झाली पाहिजे.

२८ वर्षीय डॉक्टर महिला मृत्यू प्रकरणात तिच्या तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याने तिच्यावर चार वेळा अत्याचार केला. तसेच प्रशांत बनकर नावाच्या व्यक्तीनेही तिला मानसिक त्रास दिला असल्याचा गंभीर आरोप केला आहे.





## टायगर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष तानाजी जाधव यांच्याकडून १२१ कुटुंबाची दिवाळी केली गोड

बीड (प्रतिनिधी): जिल्ह्यात मागील महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती अनेक शेतकऱ्यांची पिके व शेती पाण्याखाली गेल्याने ग्रामीण भागात अडचणी निर्माण झाल्या. या संकटाच्या काळात टायगर ग्रुपने पुढाकार घेत समाजसेवेचा सुंदर उपक्रम राबवला. गोरगरिबांना मदत व समाजसेवेत सदैव अग्रेसर असणारे टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांच्या वतीने टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष

पै. तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त आणि दीपावलीच्या शुभमुहूर्तावर १२१ गरजवंत कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. बीड शहरातील एकता नगर मधील नागरिकांची केली दिवाळी गोड



**आज टाईम्स ऑफ इंडिया महाराष्ट्राचे ब्युरो ऑफ चीफ सय्यद रिजवान उल्ला हे आज बीड येथे आले असता त्यांच्या हस्ते एका कार्यक्रमात सामाजिक व विविध क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय काम केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण यांचा सत्कार करताना टाइम्स ऑफ इंडियाचे महाराष्ट्राचे ब्युरो ऑफ चीफ सय्यद रिजवान उल्ला हे दिसत आहेत.**

इन बॉक्स

# पोलिसांच्या अत्याचाराने संपदा मुंडेंचा जीव घेतला

## रक्षकच भक्षक झाले,कठोर कारवाईची मागणी– राज्य प्रवक्ते नितीन सोनवणे

बीड (विशेष प्रतिनिधी): सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. संपदा मुंडे यांनी गेल्या रात्री टोकाचं पाऊल उचलून आत्महत्या केली. हातावर पेनाने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी पोलिस निरीक्षक गोपाल बदने याच्यावर चार वेळा बलात्कार आणि दुसऱ्या पोलिस कर्मचारी प्रशांत बनकर याच्यावर शारीरिक-मानसिक छळ केल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. या घटनेने वैद्यकीय क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून, ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तात्काळ दोषींवर कठोरात्कठोर कारवाई करून पीडितेच्या आई-वडिलांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.डॉ. संपदा मुंडे या बीड जिल्ह्यातील साध्या शेतकरी कुटुंबातील होत्या. आई-वडिलांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांना शिकवून डॉक्टर आणि नंतर वैद्यकीय अधिकारी बनवलं. डॉ. मुंडे यांनी वरिष्ठांकडे अनेकदा लेखी तक्रारी केल्या होत्या. माझ्यावर अन्याय होत आहे, मी आत्महत्या करीन, असा इशाराही त्यांनी दिला होता.

मात्र, प्रशासनाने त्यांच्या तक्रारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं आणि परिणामी ही दुर्दैवी घटना घडली. सुसाईड नोटमध्ये खासदार आणि त्यांच्या स्वीय सचिवाचा उल्लेख असल्याचंही समोर आलं असून, या प्रकरणाला आता राजकीय वळण लागण्याची शक्यता आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना प्रशासनावरून आक्रमक टीका केली आहे. न्यायुमिळावा बीड जिल्ह्याची लेक, फलटण येथे वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या डॉ.संपदा मुंडे यांच्यावर आत्महत्या करण्याची दुर्दैवी वेळ आणणाऱ्या नराधमांना तात्काळ आणि कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. सोनवणे म्हणाले, प्रशासनाने कडक कारवाई करून या ताईला आणि तिच्या आई वडिलांना न्याय मिळवून द्यावा.आईवडिलांनी लेकिला जन्म दिला, लहानाचं मोठं केलं, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत लेकीला शिकवलं, डॉक्टर बनवलं, अधिकारी बनवलं, लेकिने प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष केला, आईवडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी रात्रंदिवस कष्ट करून यश मिळवलं आणि काही गिधाडांच्या, श्वापदांच्या अतिरेकी कृत्याचे एका क्षणात सगळं होत्याचं नव्हतं झालं, मायबापांच्या काळजाच्या ठिकऱ्या उडाल्या असतील. त्या गिधाडांना, हिंस्र श्वापदांना सोडता कामा नये. न्याय मिळावा अशी अपेक्षा!सोनवणे यांनी पुढे सांगितलं, रक्षकच जर भक्षक होत असतील तर 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रिद वाक्य घेऊन चालणाऱ्या पोलिस प्रशासनाची प्रतिमा मलिन होतेय. कठोर कारवाई व्हायला हवी!

या प्रकरणात फलटण पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, साताराचे एसपी दोषी जी यांनी तात्काळ चौकशी सुरू केल्याची माहिती दिली आहे. मात्र, ऑल इंडिया पँथर सेनेच्या कार्यकर्त्यांनी सातारा आणि फलटणमध्ये निदर्शनांचा इशारा दिला असून, पीडितेच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी सुरू केली आहे.या घटनेने वैद्यकीय संघटना आणि महिला संघटनांमध्येही रोष निर्माण झाला आहे. दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली असून, हे प्रकरण संघटनेच्या न्यायालयात घेऊन जाण्याचा इशारा दिला आहे. डॉ. संपदा मुंडे यांच्या अकाली मृत्यूमुळे फलटण शहरात शोककळा पसरली असून, प्रशासनाने तातडीने न्याय दिला नाही तर मोठा गोंधळ होईल,



